महाराष्ट्र पक्षिमित्र संघटनेचे त्रैमासिक मुखपत्र
मिळून सारेजण करू द्विजगण रक्षण !

# पक्षिमित्र

रजि. नं. महा./285/98/ नागपूर

संपादक : श्री. किरण मोरे

- वर्ष – सोळावे
- अंक २ रा
- १ जानेवारी २०२६
- पाने – २४





मा.श्रीनिवास रेड्डी यांचे हस्ते ३८ वे महाराष्ट्र पक्षिमित्र संमेलनाचे उद्घाटन



वेक्सची रौप्यमहोत्सवी स्मरणिका, 'रानवेध' चे मान्यवरांचे हस्ते प्रकाशन



३८ वे महाराष्ट्र पक्षिमित्र संमेलनाच्या छायाचित्र प्रदर्शनीचे उद्घाटन
करतांना मा.श्रीनिवास रेड्डी



३८ व्या महाराष्ट्र पक्षिमित्र संमेलनाचे अध्यक्ष मा.प्रविणसिंह परदेशी
यांना कार्यभार हस्तांतरीत करतांना डॉ. अनिल माळी



३८ वे महाराष्ट्र पक्षिमित्र संमेलनाचे उद्घाटक मा.श्रीनिवास रेड्डी यांचा
अमरावतीकरांच्या वतीने हृदय सत्कार




३८ वे महाराष्ट्र पक्षिमित्र संमेलनात मा.सौम्या शर्मा चांडक
म.न.पा.आयुक्त यांचा सत्कार करतांना डॉ. अंजली देशमुख



३८ वे महाराष्ट्र पक्षिमित्र संमेलनातील छायाचित्र प्रदर्शनीची
पाहणी करतांना संमेलनाचे अध्यक्ष मा.प्रविणसिंह परदेशी



३८ वे महाराष्ट्र पक्षिमित्र संमेलन यशस्वीपणे पार पाडण्यात
मोलाचा सहभाग असणारे वन्यजीव पर्यावरण संवर्धन संस्थेचे
पदाधिकारी व स्वयंसेवक

संपादक
**श्री. किरण मोरे**
विद्यापीठ कॉलनी,एम.आय.डी.सी.रोड,
मनोर मांगल्य जवळ, अमरावती ४४४ ६०६
मो.९९२३९१००३४ Email - kiranmorey1983@gmail.com

मार्गदर्शक
**डॉ. निनाद शहा** सोलापूर
**श्री. अविनाश कुबल** ठाणे

**कार्यकारिणी**

| | |
|---|---|
| अध्यक्ष | **डॉ. जयंत वडतकर**, अमरावती<br>मो. ९८२२८७५७७३ |
| कार्याध्यक्ष | **प्रा. डॉ. सुधाकर कुऱ्हाडे**, अहमदनगर<br>मो. ९८५०२९१३२४ |
| कार्यवाह | **प्रा. डॉ. गजानन वाघ**, अमरावती<br>मो. ९८२२२०४०७० |
| संघटक | **डॉ. अनिल माळी**, नाशिक<br>मो. ९८५०८१८६४४ |
| सहसंघटक | **श्री. अविनाश कुबल**, ठाणे<br>मो. ९३२४२३८०३१ |
| सहकार्यवाह | **श्री. निनाद शहा**, सोलापूर<br>मो. ९४२२४५९९१५ |
| सदस्य | **श्री. किशोर गठडी**, औरंगाबाद<br>मो. ९४२२२०२६२८ |
| सदस्य | **सौ. रूपाली सरोज**, रेवदंडा<br>मो. ९८६९५५९९२२ |
| सदस्य | **श्री. माणिक पुरी**, परभणी<br>मो. ९८८१९६७३४६ |
| सदस्य | **श्री. नितीन मराठे**, नागपूर<br>मो. ९४२११८९३३३ |
| सदस्य | **श्री. अमोल सावंत**, अकोला<br>मो. ९८२२७२८८२३ |

**सल्लागार मंडळ**

**श्री. भाऊ काटदरे** (चिपळूण) मो. ९४२३८३१७००
**श्री. दिगंबर गाडगीळ** (पुणे) मो. ९८८१०७९७११
**डॉ. दिलीप यार्दी** (औरंगाबाद) मो. ९४२२७०४२२१
**डॉ. अनिल पिंपळापुरे** (नागपुर) मो. ९८८१७१३४६६
**श्री. बापुसाहेब भोसले** (अहमदनगर) मो.९८२२६३३१३३
**श्री. राजु कसंबे** (मुंबई) मो.९००४९२४७३१

**मुखपृष्ठ – मोठा पाणकावळा** (Greater Cormorant )
श्री. दिग्विजय लांडे, वन्यजीव छायाचित्रकार,नागपूर

# संपादकीय..



३ जून २०१९ चा उन्हाळ्याचा दिवस. अमेरिकेमधील न्यू जर्सी समुद्रकिनारी एका मोठ्या संगीत मैफिलीची तयारी जोरात चालू असते. 'सॅण्डी हुक फाउंडेशन'च्या उन्हाळी बीच कॉन्सर्टसाठी हा किनारा दरवर्षी वापरला जातो.

या मैफिलीला हजारो श्रोते व पर्यटक गर्दी करतात. तयारी दरम्यान काही जणांना किनाऱ्यालगत एका पक्ष्याचे घरटे दिसते. त्याकडे दुर्लक्ष न करता ते लगेच संबधितांना कळवितात. 'पायपिंग प्लोवर,' या दुर्मिळ पक्ष्याचे ते घरटे असल्याचे तिथल्या पक्षी-अभ्यासकांच्या निदर्शनास येते. सद्यस्थितीत संपूर्ण अटलांटिक समुद्रकिनारी या पक्षी प्रजातीची तीन हजार घरटी उरली आहेत, तर जगामध्ये त्यांची एकूण संख्या अवघी आठ हजारांपर्यंत आहे. अशा दुर्मिळ प्रजातीची वीस घरटी संगीत कार्यक्रम होऊ घातलेल्या ठिकाणी अचानकपणे सापडली. त्यातील काही घरट्यात पायपिंग प्लोवर त्यांची अंडी उबवित होते, तर काही घरट्यांत त्यांची पिले आढळली.

'अरेरे! बिचाऱ्या ह्या दुर्मिळ पक्षी-प्रजातीची घरटी आता नष्ट होणार!' आपल्याकडील जनसामान्यांच्या मनात पहिला विचार हाच येईल. पण, तिथे अमेरिकेत काय झाले असेल? त्यांनी त्यावेळी ती कॉन्सर्ट चक्क रद्द केली. 'अमेरिका फिश अँड वाईल्डलाईफ सर्विस'ने त्या फाउंडेशनला तशी सूचनावजा आज्ञा दिली. आणि रद्द करण्याचे कारण काय दिले? घरट्याच्या एक हजार मीटर परिसरात कार्यक्रम घेतला तर, होणाऱ्या ध्वनी प्रदूषणामुळे पायपिंग प्लोवरला अंडी उबविण्यात आणि पिलांचे संगोपन करण्यास बाधा येईल, हे! कॉन्सर्ट दुसऱ्या जागी घेता येईल; पण, पायपिंगच्या घरट्यांची जागा दुसरीकडे हलविता येणार नाही, हे तेथील पक्षी अभ्यासकांनी त्यावेळी स्पष्टपणे नमूद केले.

ही गोष्ट पुन्हा आठवण्याचे कारण म्हणजे, आपल्याकडील पक्ष्यांच्या प्रजननाच्या जागा (ब्रीडिंग कॉलनी), विकास नि सौंदर्यीकरणाच्या नावाखाली ज्या प्रमाणात प्रदूषित होतात, नष्ट होतात, त्याचे आपल्याला काही वाटेनासे झाले आहे. किंबहुना, ते आपल्या अंगवळणीच पडले आहे. पर्यावरण ऱ्हासाच्या घटना दररोज घडतात. त्याला सामोरे जातांना लोक अथवा लोक प्रतिनिधी ती जबाबदारी सहसा घेत नाहीत. मात्र, पाश्चिमात्य देशात पर्यावरणाप्रती लोक बऱ्यापैकी सजग असतात.
आपल्याकडे पक्षी संवर्धनाच्या जबाबदारीची जाणीव व्हायला हवी, आणि त्यासंबंधी शासनाकडे रेटाही!

या सर्व कल्लोळात समाधानाची बाब अशी की, महाराष्ट्रातील पक्षिमित्र आपापल्यापरीने पक्षिसंवर्धन व त्यासंबंधी जनजागृती करीत असतात. नुकतेच तिसरे अखिल भारतीय, तसेच ३८ वे 'महाराष्ट्र पक्षीमित्र संमेलन,' अमरावती येथे यशस्वीरीत्या पार पडले. यात तीनशे पक्षिमित्रांनी हजेरी लावली. त्याचा सविस्तर अहवाल अंकात आलेला आहे. पक्षी-सप्ताहातून पक्षिविषयी जागरूकतेचे कार्यक्रम राज्यभर घेण्यात आले. त्याची थोडक्यात माहिती, तसेच पक्षी-अभ्यासक आणि पक्षिमित्रांचे लेख, छायाचित्रे आणि महाराष्ट्रातील पक्ष्यांसंबधी महत्त्वाच्या घडामोडींची माहिती आपल्याला या अंकात वाचायला मिळेल, आणि त्याचा आनंदही घेता येईल.

# * अध्यक्षीय *



**डॉ. जयंत वडतकर**
अध्यक्ष,महाराष्ट्र पक्षीमित्र
jayantwadatkar.wecs@gmail.com

सप्रेम नमस्कार,
नवीन वर्षाच्या सर्वांना हार्दिक शुभेच्छा!

यावर्षीचे म्हणजेच, २०२५ चे ३८ वे 'महाराष्ट्र पक्षीमित्र संमेलन,' हे अमरावती येथे 'वन्यजीव व पर्यावरण संवर्धन संस्था (WECS),' यांच्या यजमानपदाखाली, दि. १ व २ नोव्हेंबर २०२५ दरम्यान अतिशय उत्साहात व यशस्वीरित्या संपन्न झाले. या संमेलनात राज्यातून २५० आणि स्थानिक ५० असे एकूण ३०० प्रतिनिधी सहभागी झाले होते. इतकी भरगच्च उपस्थिती हा आजवरच्या संमेलनांचा उच्चांक ठरला. संमेलनातील उपस्थितीशिवाय दोन्ही दिवस दर्जेदार सादरीकरणे व विविध उपक्रम यांनी हे संमेलन विशेष ठरले. संमेलनासाठी उद्‌घाटक म्हणून राज्याचे प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव) मा. एम. श्रीनिवास रेड्डी लाभले होते. तसेच, प्रमुख उपस्थितीमध्ये अमरावती मनपाच्या आयुक्त मा. सौम्या शर्मा (भाप्रसे) आणि मेळघाट व्याघ्र प्रकल्पाचे क्षेत्र संचालक मा. आदर्श रेड्डी होते. या संमेलनाचे संमेलनाध्यक्ष म्हणून ज्येष्ठ पक्षिमित्र तथा सध्या मा. मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य, यांचे मुख्य आर्थिक सल्लागार असलेले निवृत्त प्रशाकीय अधिकारी मा. प्रवीणसिंह परदेशी (भाप्रसे), हे लाभले. राज्याच्या कानाकोपऱ्यातून या संमेलनासाठी उपस्थित असलेले प्रतिनिधी यांच्यामुळेच हे संमेलन यशस्वी झाले, यात शंका नाही. या संमेलनाचे आयोजक वेक्स, अमरावती, या संस्थेने आपल्या रौप्यमहोत्सवी वर्षानिमित्त आयोजित केलेले हे संमेलन उत्कृष्ट व एक आदर्श निर्माण करणारे ठरले. 'महाराष्ट्र पक्षीमित्र'तर्फे 'वेक्स' या संस्थेचे सर्व पदाधिकारी आणि कार्यकर्ते यांचे अभिनंदन आणि आभार. या संमेलनाचा सविस्तर अहवाल या अंकात आणि आपल्या संकेतस्थळावरही प्रकाशित करण्यात आला आहे.

'महाराष्ट्र पक्षीमित्र'चे सभासद राज्याच्या कानाकोपऱ्यात, गावागावात तयार होत आहेत. या वर्षाच्या अखेरीस आपल्या सभासदांची संख्या १७०० पार होणार आहे. अलीकडे सभासद संख्या झपाट्याने वाढीस लागली आहे. राज्यात पक्षिसंवर्धन व जनजागृतीसाठी महाराष्ट्र पक्षीमित्रचे हेच सभासद आपली खरी ताकद आहेत. या सभासदांना 'पक्षीमित्र'चळवळीत सामावून घेणेसुद्धा आवश्यक आहे. भविष्यात, वेगवेगळ्या जिल्ह्यात विविध कार्यक्रमांचे आयोजन होण्यासाठी संस्थेने आपल्या सभासदांना प्रोत्साहित करणे आवश्यक आहे. त्यासाठी, प्रत्येक जिल्ह्यात आपला एक प्रतिनिधी किंवा जिल्हा समन्वयक असणे आवश्यक आहे. मागील सहा वर्षांत असे प्रतिनिधी अनेक जिल्ह्यात कार्यरत होते. त्यातील काहींनी उत्कृष्ट कार्य केले व 'पक्षीमित्र'चळवळ मजबूत करण्यास हातभार लावला आहे. यावर्षी आपण काही जिल्ह्यात नव्याने जिल्हा प्रतिनिधी यांची निवड केली आहे. त्यासाठी मागील दोन महिन्यांच्या काळात विविध माध्यमातून संपर्क व शोध सुरू होता. या सर्व जिल्हा समन्वयक आणि विभागीय समन्वयकाची नावे व संपर्क क्रमांक आपल्या संकेतस्थळावर अद्ययावत करण्यात आली आहेत. आपण आपल्या जिल्ह्यातील समन्वयकांशी संपर्क करून, 'पक्षीमित्र'चळवळीत व संस्थेच्या उपक्रमांत सहभागी होऊ शकता.

कोल्हापूर जिल्ह्यातील नेसरी येथील एस. एस. हायस्कूल व संहिता प्रतिष्ठान यांच्यातर्फे कोल्हापूर जिल्ह्यातील पहिल्या विद्यार्थी पक्षीमित्र संमेलनाचे नोव्हेंबर महिन्यात नुकतेच आयोजन करण्यात आले होते. या संमेलनासाठी मी उपस्थित राहाणार होतो; मात्र, वेळेवर झालेल्या तारखेतील बदलामुळे मला उपस्थित राहता आले नाही. तथापि, या निमित्ताने कोल्हापूर जिल्ह्यात पुन्हा एकदा 'पक्षीमित्र' चळवळ क्रियाशील झाली, असे म्हणता येईल. संमेलनासाठी जाता आले नाही; तरी त्याच्या पुढील आठवड्यात कोल्हापूर येथे जाण्याचा योग आला. निमित्त होते, कोल्हापूर जिल्हा पक्षिमित्र संवाद सभेचे! जिल्ह्यातील सभासदांशी संवाद साधण्याच्या दृष्टीने व 'पक्षीमित्र'चळवळ आणखी वाढीस लागावी या दृष्टीने कोल्हापूर जिल्ह्यात दि. ७ डिसेंबर रोजी एका संवाद सभेचे आयोजन करण्यात आले होते. या सभेसाठी मी स्वतः उपस्थित राहून सभासदांशी व जिल्ह्यातील पक्षिमित्रांशी संवाद साधला. याशिवाय, 'महाराष्ट्र पक्षीमित्र'ला अधिक व्यापक करण्याच्या दृष्टीने जिल्ह्यात विविध ठिकाणी भेटी देऊन अनेक पक्षिमित्र व निसर्गप्रेमी मंडळी, शाळा व महाविद्यालयातील विद्यार्थी तसेच शिक्षक यांच्याशीसुद्धा संवाद साधला. सदर संवाद सभेचे आणि कोल्हापूर जिल्हा दौऱ्याचे नियोजन म.प.चे ज्येष्ठ सभासद श्री. रविंद्र अष्टेकर, प्रख्यात छायाचित्रकार श्री. अनिल वेल्हाळ, श्री. अनंत पाटील व प्रा. डॉ. अनिल मगर ह्यांच्या पुढाकारने करण्यात आले होते. यादौऱ्यात प्रथम दि. ६ डिसेंबर २०२५ रोजी कोल्हापूर जिल्ह्यातील गडहिंग्लज येथील विद्या प्रसारक मंडळ संचालित डॉ. घाळी महाविद्यालयातील

प्राणिशास्त्र विभागातील पदव्युत्तर विद्यार्थ्यांशी, ‘पक्षी जैवविविधता आणि संवर्धन,’ या विषयावर मी संवाद साधला. तसेच, गडहिंग्लज नगरपालिकेलासुद्धा भेट देण्यात आली. गडहिंग्लज नगरपालिकेतर्फे २०१६ यावर्षी, ‘चिमणी,’ हा नगर पक्षी म्हणून निवडण्यात आला होता व या चिमणीचे एक शिल्पसुद्धा उभारले आहे. यावेळी, आम्ही चौकातील ‘चिमणी,’ या शिल्पास भेटही दिली. दुसऱ्या दिवशी दि. ७ डिसेंबर २०२५, रविवार रोजी, कोल्हापूर जिल्हा महाराष्ट्र पक्षीमित्र सभासदांच्या संवाद सभेचे आयोजन करण्यात आले होते. कोल्हापुरातील करवीर नगर वाचन मंदिर, राजाराम रोड, कोल्हापूर येथे पार पडलेल्या या सभेला जिल्ह्यातील आजीवन सभासद, निसर्गप्रेमी, विविध संस्थांचे पदाधिकारी यांच्यासह ४० पक्षिमित्रांची उपस्थिती होती. या संवाद सभेचा सविस्तर अहवाल या अंकात देण्यात आला आहे.

आता मकर संक्रांत आली आहे. पतंग व मांजाचा व्यवसाय या काळात जोरात असतो, मांजामुळे रस्त्यावर अपघात होतात, गळे चिरले जातात. या कारणाने, राष्ट्रीय हरित लवाद (NGT) कडून नायलॉन/चायनीज मांजाचा व्यापार, साठवणूक, विक्री व वापरावर ११ जुलै २०१७ च्या निर्णयानुसार सरसकट बंदी घालण्यात आली आहे. NGT ने या निर्णयाच्या अनुषंगाने मांजा विक्रीवर कारवाई करण्यासाठी Environment (Protection) Act 1986; Prevention of Cruelty of Animal Act 1960; Wildlife (Protection) Act 1972; Indian Pinal Code इत्यादी कायद्यांतर्गत कारवाई करण्याबाबत निर्देश दिलेले आहेत. स्थानिक पोलीस प्रशासन अनेक ठिकाणी मांजा जप्तीची कारवाई करतांनासुद्धा दिसत आहे. मात्र, त्यानंतरही मांजा वापर कमी झाल्याचे दिसत नाही. याचाच अर्थ लोकांमध्ये याबद्दल अजूनही जागृती झालेली नाही. किंवा समाजातील एका वर्गाला या गोष्टीचे काही सोयरसुतक नाही, असेच यातून लक्षात येते. आपल्या आनंदासाठी हजारो पक्ष्यांचे बळी जातात, रस्त्यावर मोटारसायकल स्वारांचे गळे चिरले जातात, याचे गांभीर्य मांजा वापरणाऱ्यांना कधी येणार? त्यासाठी जनजागृतीची मोठ्या प्रमाणात आवश्यकता आहे. तसेच, वापरणाऱ्यांवर व विक्री करणाऱ्यांवर पोलीस, पालिका प्रशासन व वन विभाग यांनी स्थानिक स्तरावर मोठ्या प्रमाणात कारवाईसुद्धा करणे गरजेचे आहे. त्यासाठी आपले पक्षिमित्र दरवर्षी प्रशासनाला निवेदनही देत असतात. अनेक पक्षिमित्र विविध माध्यमातून जनजागृतीदेखील करीत असतात. हे सर्व ठिकाणी, प्रत्येक गावात होणे गरजेचे आहे. पक्षिमित्र म्हणून आपण ती जबाबदारी पूर्ण करण्याचा प्रयत्न करू या!

आपणास आठवत असेल की मध्यंतरी प्रशासकीय अधिकारी श्री. राजेश खवले (सभासद म.प.) यांनी ‘मराठी पक्षी विश्वकोश,’ तयार करण्याची कल्पना मांडली होती. आपल्या पक्षिमित्रांच्या सहकार्याने हा पक्षी कोष लिखाण करण्याचा त्यांचा मानस होता. आता हा प्रकल्प ‘महाराष्ट्र पक्षीमित्र’तर्फे करण्याचा मानस आहे. या संदर्भात माझी श्री. खवले सरांशी सविस्तर चर्चा झाली आहे. यासंदर्भात आपल्याला तसा प्रस्ताव द्यावा लागेल. याबाबत आपले काय मत आहे किंवा काही सुचना असतील तर, आपण जरूर कळवा.

मिळून सारे जण । करू द्विजगण रक्षण ।।

*****









# कोल्हापूर येथे महाराष्ट्र पक्षिमित्रची संवाद सभा संपन्न

कोल्हापूर जिल्ह्यातील पक्षिमित्रांचे संघटन मजबूत करून पक्षिमित्र संघटनेचे कार्य अधिक व्यापक करण्याच्या दृष्टीने कोल्हापूर येथे महाराष्ट्र पक्षिमित्रच्या सभासदांच्या संवाद सभेचे आयोजन करण्यात आले होते. या सभेसाठी महाराष्ट्र पक्षिमित्रचे अध्यक्ष डॉ. जयंत वडतकर यांनी उपस्थित राहून सभासदांशी व जिल्ह्यातील पक्षिमित्रांशी संवाद साधला. या शिवाय महाराष्ट्र पक्षिमित्रला अधिक व्यापक करण्याच्या दृष्टीने जिल्ह्यात विविध ठिकाणी भेटी देऊन अनेक पक्षिमित्र व निसर्गप्रेमी मंडळी, शाळा व महाविद्यालयातील विद्यार्थी तसेच शिक्षक यांचेशी सुद्धा संवाद साधला. सदर संवाद सभेचे आणि कोल्हापूर जिल्हा दौऱ्याचे नियोजन म.प.चे जेष्ठ सभासद श्री. रविंद्र अष्टेकर, श्री. अनिल वेल्हाळ, श्री. अनंत पाटील (गडहिंग्लज) व प्रा.डॉ. अनिल मगर यांच्या पुढाकारने करण्यात आले होते.

या दौऱ्यात प्रथम दि.०६ डिसेंबर २०२५ रोजी कोल्हापूर जिल्ह्यातील गडहिंग्लज येथील विद्या प्रसारक मंडळ संचालित डॉ. घाळी महाविद्यालय येथे एका कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी सर्वप्रथम या महाविद्यालयाच्या संचालक मंडळाशी वार्तालाप करून महाराष्ट्र पक्षिमित्र संघटनेचे कार्य आणि पक्षिमित्र चळवळीची आवश्यकता या विषयावर डॉ. जयंत वडतकर यांनी सर्व उपस्थितांशी चर्चा केली. यावेळी विद्या प्रसारक मंडळाचे अध्यक्ष डॉ. सतीश घाळी यांनी महाराष्ट्र पक्षिमित्रच्या उपक्रमांसाठी महाविद्यालयात नेहमीच तत्परतेने पुढाकार व विद्यार्थ्यांना सुद्धा या आपल्या उपक्रमात सहभागी करून घेण्यात येईल अशी ग्वाही दिली. यावेळी महाविद्यालयातील प्राणिशास्त्र विभागातील पदव्युत्तर विद्यार्थ्यांशी पक्षी जैवविविधता आणि संवर्धन या विषयावर डॉ. जयंत वडतकर यांनी संवाद साधला. यावेळी विभागातील प्रा. महेश कदम, प्रा. निखिल घुळान्नावार, तसेच महाविद्यालयातील इतर शिक्षकांची उपस्थिती होती. डॉ. घाळी महाविद्यालयाच्या भेटीचे नियोजन आपले गडहिंग्लज येथील सभासद श्री. अनंत बाबू पाटील यांच्या पुढाकारातून करण्यात आले होते.

गडहिंग्लज नगरपालिकातर्फे २०१६ साली नगर पक्षी निवडण्याची प्रक्रिया पूर्ण करण्यात आली होती. यावेळी चिमणी हा नगर पक्षी म्हणून निवडण्यात आला होता. त्यानंतर नगरपरिषद कार्यालयासमोरील चौकात या चिमणीचे शिल्प उभारण्यात आले होते. त्या निमित्त्याने गडहिंग्लज नगरपालिकेत सुद्धा भेट देण्यात आली. नगर पक्षी उपक्रमात सहभाग नोंदवून पक्षी जनजागृती साठी नगरपालिकेने पुढाकार घेतला होता. त्याबद्दल डॉ. जयंत वडतकर यांनी महाराष्ट्र पक्षिमित्र तर्फे गडहिंग्लजच्या नागरिकांचे व नगर परिषदेचे अभिनंदन केले तसेच आभार मानलेत. त्यानंतर उपस्थित सर्वांनी चौकातील चिमणी शिल्पास भेट सुद्धा दिली. त्यानंतर कोल्हापूर जिल्ह्यातील आणखी एक तालुका आजरा या ठिकाणी सुद्धा भेट दिली. या गावाने आपला नगर पक्षी म्हणून स्वर्गीय नर्तक घोषित केलेला आहे. या निमित्त्याने येथील नागरिकांशी संवाद साधण्यात आला.

दुसऱ्या दिवशी दि. ७ डिसेंबर २०२५ (रविवार) रोजी, कोल्हापूर जिल्हा महाराष्ट्र पक्षिमित्र सभासदांच्या संवाद सभेचे आयोजन करण्यात आले होते. कोल्हापुरातील करवीर नगर वाचन मंदिर, राजाराम रोड, कोल्हापूर येथे पार पडलेल्या या सभेला जिल्ह्यातील आजीवन सभासद, निसर्गप्रेमी, विविध संस्थांचे पदाधिकारी यांचेसह ४० पक्षिमित्रांची उपस्थिती होती. यावेळी मंचावर म.प. चे अध्यक्ष डॉ. जयंत वडतकर. जेष्ठ सभासद, श्री. रवींद्र अष्टेकर, प्रा.डॉ. अनिल मगर यांची उपस्थिती होती. या सभेचे प्रास्ताविक श्री. अनंत पाटील यांनी केले. श्री अष्टेकर यांनी अध्यक्ष डॉ. जयंत वडतकर यांचा परिचय करून दिला आणि कोल्हापूर पक्षिमित्र तर्फे जेष्ठ सभासद श्री सुभाष पुराणिक यांचे हस्ते डॉ. जयंत वडतकर (अध्यक्ष) यांचा शाल-श्रीफळ व स्मृतीचिन्ह देऊन हृद्य सत्कार करण्यात आला. प्रा. मगर यांनी सर्व उपस्थितांचे स्वागत करून कोल्हापूर जिल्ह्यात पक्षिमित्र चळवळ पुन्हा बळकट करण्याचे आवाहन केले. अध्यक्ष डॉ. जयंत वडतकर यांनी आपल्या मार्गदर्शनपर भाषणात महाराष्ट्र पक्षिमित्र चळवळ विषयी आपली भूमिका विषद केली. पक्षिमित्र चळवळ अधिकाधिक बळकट करून ती व्यापक करण्यासाठी प्रयत्न केले जात असून त्यासाठी पक्षीनिरीक्षण छंदाकडे अधिकाधिक लोकांना आकर्षित करणे, राज्यात विविध जिल्ह्यात विद्यार्थी पक्षिमित्र संमेलनांचे आयोजन करणे, जिल्ह्यातील सभासदांशी संवाद वाढविणे अशा गोष्टींवर सध्या भर दिला जात असल्याचे डॉ. वडतकर यांनी सांगितले. पक्षी संवर्धनाचे आवाहन सुद्धा दिवसेंदिवस कठीण होत असल्याचे त्यांनी सांगितले. यापूर्वी तब्बल ४२ वर्षापूर्वी म्हणजे १९८३ साली कोल्हापूर जिल्ह्यातील राज्यस्तरीय संमेलन पन्हाळगड येथे पार पडले होते. त्यामुळे या दीर्घ कालखंडानंतर जिल्ह्यात पक्षिमित्र चळवळ अधिक व्यापक करण्याचे दृष्टीने व भविष्यात विद्यार्थी पक्षिमित्र संमेलन, विभागीय संमेलन व राज्यस्तरीय संमेलनांचे आयोजन कोल्हापूर जिल्ह्यात व्हायला हवे असे मत अनेकांनी व्यक्त केले. यावेळी

उपस्थितांपैकी जेष्ठ निसर्ग अभ्यासक श्री. अनिल वेल्हाळ, श्री. सुनील करकरे, श्री सुहास वैंगणकर, श्री. सुरेश शिरपूरकर, डॉ. अमोल पाटील (पेठ वडगाव), श्री राहुल मकदूम, श्री. राहुल माळी, श्री प्रणव देसाई, राजेंद्र घोरपडे आणि माजी जिल्हा समन्वयक श्री. युवराज बाळासो पाटील आदींनी आपले मनोगत व्यक्त केलेत. या कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन स्मिता शिंदे ह्यांनी केले.

जिल्ह्यात पक्षिमित्र चळवळ अधिक बळकट करण्याचे दृष्टीने आणि सभासदांशी संपर्क वाढविण्याच्या दृष्टीने कोल्हापूर जिल्हा समन्वयक म्हणून श्री अनंत पाटील (गडहिंग्लज) व निलेश घारसे (पेठ वडगांव) यांची सर्वानुमते निवड करण्यात आली. यावेळी निसर्गप्रेमी मंडळ पेठ वडगाव या संस्थेला इला फौंडेशनचा अरण्यानी पुरस्कार प्राप्त झाल्याचे निमित्याने या संस्थेच्या सर्व सदस्यांचे अभिनंदन करण्यात आले. या संवाद सभेला श्री सुनील करकरे, सुभाष पुराणीक, सुहास वैंगनकर, युवराज पाटील श्री. सुरेश शिरपूरकर, डॉ. अमोल पाटील (पेठ वडगाव), श्री राहुल मकदूम, श्री. राहुल माळी, श्री प्रणव देसाई, डॉ निलिमा पाटील, निलेश घारसे, जान्हवी घारसे, प्रज्ञा निलेश घारसे, प्रकाश जगदाळे, अमोल चरणकर, डॉ निलेश ढोबळे, विजय मुंदाळे, डॉ शुभम करडे, अभिजीत पाटील, आशिष भक्ते, अजित पाटील (चंदगड) तसेच सांगलीचे जेष्ठ सभासद श्री. शरद आपटे, मिरज येथील सौ. समृद्धी पानसरे यांचे सह अनेक पक्षिमित्र व वृत्तपत्र प्रतिनिधी यांची उपस्थिती होती. जिल्हा स्तरावर अतिशय यशस्वी सभा पार पडल्याची भावना यावेळी अनेकांनी व्यक्त केली.

कोल्हापूर संवाद सभेच्या आयोजनासाठी जेष्ठ पक्षी अभ्यासक श्री. रविंद्र अष्टेकर, प्रख्यात छायाचित्रकार श्री. अनिल वेल्हाळ आणि श्री अनंत बाबू पाटील यांनी विशेष परिश्रम घेतलेत.

*****

**सर्व सभासदांना सुचित करण्यात येते की, दि. १ जानेवारी २०२६ पासून आजीवन सभासद शुल्क व अंक निधीमध्ये वाढ करण्यात आली असून आजीवन सभासद फि व अंक निधी मिळून एकूण रक्कम रूपये २०००/– इतकी राहील**

# स्वागत नवीन सभासदांचे

**दिनांक ०१ ऑक्टोबर ते ३१ डिसेंबर २०२५ पर्यंत**

| क्र. | नाव | गाव | फोन नं. | क्र. | नाव | गाव | फोन नं. |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १६५५ | श्री. माधव मुरलीधर पिंगळे | नाशिक | ७५८८८३२७०३ | १६७७ | कु. प्रिती भाष्कर डोंगरे | भंडारा | ८२७५२८६६४९ |
| १६५६ | श्री. प्रतिक सुनिलराव चौधरी | वरूड | ९६५७३४७१७९ | १६७८ | डॉ. देवेंद भधुराव सुर्यवंशी | पुणे | ९८९०३३७७७० |
| १६५७ | डॉ. श्रीकांत आर वऱ्हेकर | अमरावती | ९४२३२०३०७० | १६७९ | श्री. सतिश गणेशराव देशमुख | अकोला | ७०५८८४९४४० |
| १६५८ | श्री. आनंद विवेक मोहोड | अमरावती | ९०७५१७९०६५ | १६८० | रिजवान मो. खान पठान | चिमूर | ९५९५६७७७७६ |
| १६५९ | श्री. अजिंक्य भटकर | नागपूर | ९७६६५९१३२३ | १६८१ | सुधिर वि भंडारकर | गोंदिया | ८७८८१८३६६० |
| १६६० | श्री. अशोक शामराव भानसे | वर्धा | ९३७३४४०६४५ | १६८२ | श्री. मयुर राजेंद्र साबळे | जालना | ७३८७९२६६९९ |
| १६६१ | श्री. दिनेश नरसिंगराव देशमुख | भंडारा | ९४२२१२१२३४ | १६८३ | ॲड आकाश विवेकराव राजुरकर | वाशिम | ९०२८८५७५९७ |
| १६६२ | श्री पंकज शत्रुघ्न वानखडे | अकोला | ९८८१४५२९४९ | १६८४ | श्री. रोहन किसनराव पाटील | सांगली | ७३८७७६४१२० |
| १६६३ | डॉ. जितेंद्र मुरतसिंग वर्मा | अमरावती | ७९७२०९८७३५ | १६८५ | डॉ. तुषार वामन पाटील | जळगांव | ९००५०५०८९९ |
| १६६४ | सौ. मनिषा संजय विधळे | अमरावती | ९४०४५१८१६७ | १६८६ | श्री. सुरेश किसन ठाकुर | जळगांव | ९६७३३५४८७७ |
| १६६५ | श्री. मनेषकुमार सज्जन | वर्धा | ७०३८६६६९८७ | १६८७ | श्री. स्वप्नील प्रभाकर कुळकर्णी | जळगांव | ९३७०५२३२८० |
| १६६६ | श्री हेमंत धानोरकर | बिड | ९९६००९६०६२ | १६८८ | डॉ.प्रो.यशवंतराव बळिराम पाटील | बुलढाणा | ९४०३३१९६६८ |
| १६६७ | श्री. सतिश लक्ष्मणराव मुळे | छ.संभाजीनगर | ९८२३१४३४५६ | १६८९ | श्री. पवन विनायकराव दरणे | वर्धा | ९७६४९७०८७० |
| १६६८ | श्री. प्रणय पुरूषोत्तम वंजारी | ब्रम्हपुरी | ७०३८८२१५५३ | १६९० | श्री. धरमदिप जनार्दन इंगळे | अकोला | ८४१२०८८३७२ |
| १६६९ | श्री. तुषार कमलाकर राऊत | चंद्रपुर | ८९५६३५५४२७ | १६९१ | श्री.राहुल विद्या–प्रभाकर विलडकर | अहिल्यानगर | ९८२२२५०४१० |
| १६७० | श्री. विवान सनी पाटील | बेळगांव | ९०३६४७९०८० | १६९२ | डॉ. पुरूषोत्तम साहेबराव कुंदे | अहिल्यानगर | ९५५२५५४२८४ |
| १६७१ | श्री. राजदिपसिंग राठोड | वर्धा | ९८९०७५४९५८ | १६९३ | कु. प्रेम प्रभाकर अवचार | अकोला | ८४४६६४५४६९ |
| १६७२ | श्री. जगदिश दिलीप गुप्ता | अमरावती | ७९७२६४७३४४ | १६९४ | श्री. गौरव भानुदास झटाले | अकोला | ७३८५२५७५८३ |
| १६७३ | श्री. गिरीष रविंद्र कुळकर्णी | वडोदरा गुजरात | ९७६६२७००८५ | १६९५ | श्री. वैभव मारुती घाटगे | कोल्हापुर | ९८५००४८५४६ |
| १६७४ | श्री. प्रविण भिमराव वासनिक | नांदगांव खं.अम. | ९४२३३८५६०७ | १६९६ | श्री. बाळासाहेब अंद्रेस मुंतोडे | अहिल्यानगर | ९९२१८०९३७१ |
| १६७५ | ॲड राजेश बि. तायडे | अमरावती | ७९७७६०८८१३ | १६९४ | श्री. सुहास एम. वैंणगनकर | कोल्हापुर | ९१७२७१३१११ |
| १६७६ | डॉ. शुभम सि. अंबिलकर | गोंदिया | ८०८७७३२९९७ | | | | |

# १ ले कोल्हापूर जिल्हा विद्यार्थी पक्षीमित्र संमेलन २०२५

**शनिवार दि. २९ नोव्हेंबर २०२५**

**स्थळ–पद्मभूषण डॉ. सलीम अली पक्षी नगरी, एस. एस. हायस्कुल व शिवाजी ज्युनिअर कॉलेज नेसरी.**

**पहिले कोल्हापूर जिल्हा विद्यार्थी पक्षीमित्र संमेलन २०२५ –** कोणत्याही शाळेच्या संमेलन किंवा कौतुक संमेलनात प्रमुख पाहुण्यांच्या भाषणात ठरलेले वाक्य म्हणजे 'छंद माणसाचे व्यक्तिमत्व घडवतात. शालेय जीवनात वाचन, संगीत, वाद्य वाजवणे, नृत्य, चित्रकला अभिनय या छंदाची ओळख होणे सध्याच्या काळात सर्वांगीण व्यक्तिमत्त्व विकासाचा छंद म्हणजे निसर्ग निरीक्षण व पक्षी निरीक्षण या छंदामुळे विद्यार्थ्यांचे नव्हे तर मोठ्यांचे ही जीवन समृद्ध झालेले आहे. पक्षी निरीक्षणाच्या छंदामुळे सर्वात जास्त विकसित होणारा गुण म्हणजे एकाग्रता व निरीक्षण क्षमता किंवा पारखण्याचे कौशल्य. पक्षी निरीक्षणामुळे शोध वृत्ती संशोधन गती, माहितीचे लिखाण करणे त्यांचे डॉक्युमेंटेशन करणे अनुभव संकलन व्याख्यान रूपात माहिती किंवा व्याख्यान देणे इत्यादी सद्‌गुण वाढीस लागतात. म्हणूनच निसर्गाचे पालन जपणूक करण्याची सवय लागते. जंगल भ्रमंतीची सवय वाढीस लागते. निसर्ग भटकंती करून अधिकाधिक ज्ञान मिळवण्याचा ध्यास निर्माण होतो. समाजात लोकांमध्ये निसर्गाबाबत अनास्था दूर करायची असेल तर पक्षी अभ्यास, पक्षी अधिवास, जल जंगल आणि जमिनीवरील पक्षी जैवविविधतेचे संरक्षण व संवर्धन, जनजागृतीचे हेतूने पश्चिम महाराष्ट्रातील पहिले कोल्हापूर जिल्हा विद्यार्थी पक्षी मित्र संमेलन शनिवार दिनांक २९ नोव्हेंबर २०२५ रोजी नेसरी,तालुका चंदगड, जिल्हा कोल्हापूर येथे घेण्यात आले . महाराष्ट्र राज्य पक्षीमित्र व संहिता प्रतिष्ठान संयोजित आणि एस.एस. हायस्कूल व छत्रपती शिवाजी जुनिअर कॉलेज नेसरी द्वारा आयोजित या संमेलनात सुमारे ७५० विद्यार्थी व अंदाजे ५० शिक्षक वृंद आणि इतर कर्मचारी वर्ग उपस्थित होते संमेलना अध्यक्ष शिक्षण समिती कसबा नेसरीचे अध्यक्ष मा. ड. हेमंत तुकाराम कोलेकर हे होते तर प्रमुख उपस्थिती डॉ.सौ अर्चना हेमंत कोलेकर,सचिव शिक्षण समिती कसबा नेसरी व मा. श्री.निखिल नागुर्डेकर शाखा अभियंता ग्रामीण पाणीपुरवठा विभाग सिंधुदुर्ग जे या शाळेचे माजी विद्यार्थी आहेत यांची प्रमुख उपस्थिती होती. संमेलनाचे उद्घाटन मा.श्री. शिवाजीराव पाटील आमदार चंदगड विधानसभा मतदारसंघ यांनी केले तर कै.आप्पासाहेब नलवडे सहकारी साखर कारखाना लिमिटेड हरळी तालुका गडहिंग्लज चे चेअरमन प्रकाश भाई पताडे हे संमेलनाचे प्रमुख पाहुणे होते. कोल्हापूर जिल्ह्यातील हे पहिलेच पक्षी मित्र संमेलन होते. एस एस हायस्कूल व छत्रपती शिवाजी ज्युनिअर कॉलेज नेसरी तालुका गडहिंग्लजचे प्राचार्य श्री. संजय कालकुंद्रीकर सरांनी आयोजन केले होते. शाळा कॉलेजची सुमारे ७५० विद्यार्थी जे पाच ते बारा इयत्ता मधील होते. त्यांनी या संमेलनात भाग घेतला शिक्षक वृंद व इतर कर्मचारी वर्ग मिळून ५० पक्षीमित्र सहभागी झाले होते. संमेलनाची सुरुवात पक्षी जनजागृती दिंडीने झाली. सकाळी ९.३० ते १०.३० वा. या वेळेत पाना फुलांनी सजवलेल्या पालखीत पद्मभूषण डॉ.सलीम अली व अरण्य ऋषी पद्मश्री स्वर्गीय मारुती चितमपल्ली यांचे फोटो ठेवले होते. शालेय मुलांनी काही पक्षांचे चेहरे मुखवटे धारण केले होते. मोर,चिमणी,कावळा, कबूतर ,भारद्वाज ,घुबड अशा पक्षी वेषात काही विद्यार्थी सजून आले होते. नेसरी गावातील मुख्य चौकातून पक्षी जनजागृती दिंडी फिरवण्यात आली अत्यंत शिस्तबद्ध व नियोजनबद्ध पद्धतीने हे संचलन झाले या शाळा व कॉलेजच्या परिसरात पद्मभूषण डॉ. सलीम अली पक्षी नगरी असे नामकरण करण्यात आले होते. या पक्षी नगरीच्या प्रांगणात दिंडी आल्यानंतर मार्गदर्शक पाहुण्यांसोबत छायाचित्रे घेण्यात आली यानंतर शिवणगे गावातील निवासी पक्षी निरीक्षक व पक्षी अभ्यासक मा. श्री. अजित पाटील यांनी संकलन केलेल्या पक्षी छायाचित्र प्रदर्शनाचे उद्घाटन जेष्ठ पक्षीअभ्यासक श्री. निनाद शहा यांनी केल व ते सर्वांना पाहण्यासाठी खुले करण्यात आले मार्गदर्शक प्रमुख पाहुणे संमेलनाध्यक्ष उद्घाटक श्री निनाद शहा यांच्या अनौपचारिक गप्पांसोबत सकाळचा चहा नाश्ता झाला व त्यानंतर व्यासपीठावरील कार्यक्रमाला सुरुवात झाली प्रथम या संमेलनातून मार्गदर्शन करणाऱ्या प्रमुख वक्त्यांची ओळख व स्वागत करण्यात आले पुष्पगुच्छ व शाल देऊन सुस्वागतम झाल्यानंतर दीप प्रज्वलन करून संमेलनाची सुरुवात झाली. शालेय मुलीने 'किलबिल किलबिल पक्षी बोलती ' हे सुंदर बालगीत गाऊन पक्षी मित्रांमध्ये पक्षी जनजागृती निर्माण केली संमेलनाचे उद्घाटक प्रमुख पाहुणे संमेलनाध्यक्ष इ. चे दोन दोन मिनिटे मनोगत व्यक्त झाले. या पक्षी संमेलनाचे प्रमुख आकर्षण होते चार मार्गदर्शनकांचे पीपीटी वर स्लाईड शो व विविध विषयावर मनोरंजक माहिती कोल्हापुरातील प्रसिद्ध निसर्ग प्रकाश चित्रकार श्री अनिल वेल्हाळ यांचे पक्षी प्रकाश चित्रकार श्री अनिल वेल्हाळ यांचे प्रकाश चित्रण/ छायाचित्रण या विषयावर अत्यंत प्रभावी व उद्बोधनपर व्याख्यान झाले स्वतः काढलेल्या पक्ष्यांच्या फोटोंनी विद्यार्थ्यांचे लक्ष वेधून तर

घेतलेच पण छायाचित्रण करताना अडीअडचणी गमतीजमती पण त्यांनी मांडल्या. त्यानंतर प्राध्यापक अनिल मगर सरांनी विद्यार्थ्यांना कळेल अशा साध्या सुबोध भाषेत पक्षी जगत या विषयावर माहिती दिली पक्षी जगतातील विविध पैलू त्यांनी उघडून दाखवले निसर्गातील सर्व पशु प्राणी वनस्पती जंगलाबरोबर पक्षांचे अनोखे जगताची त्यांनी फोटोच्या मदतीने सफर घडवून आणली. तिसऱ्या मार्गदर्शिका प्राध्यापक स्मिता कदम शिंदे कोल्हापूर मॅडमनी पक्षांना प्रणयलीला या अनोख्या मनोरंजक विश्वाची माहिती सांगितली प्रणयलीला म्हणजे प्रेम व्यक्त करण्याची भावना काउंटर शिप इन बर्ड्स म्हणजे नरपक्षी प्रजननासाठी मादी पक्षनेला कधी आवाजातून कधी गाणं गाऊन कधी पिसारा फुलवून तर कधी नृत्य करून पंखांची रंगसंगती दाखवून साद घालतो व प्रणयाराधन करतो अशा अनोख्या विषयावर स्मिता मॅडमनी गमतीदार पद्धतीने माहिती दिली डॉक्टर श्री अनंत पाटील सरांनी पक्षांच्या गमती जमती वर मनोरंजक व्याख्यान दिले पक्षांमधील खेळकरपणा खोडकरपणा व गमतीजमती ऐकून संमेलनातील शाळकरी पक्षी मित्रांना मजा आली कोल्हापूर जिल्ह्यातील हे पहिले विद्यार्थी पक्षिमित्र संमेलन भरवण्यासाठी श्री अनंत पाटील व अडवोकेट हेमंत कोलेकर प्राचार्य व मुख्याध्यापक यांनी विशेष परिश्रम घेतले या सर्वांची उपस्थिती विद्यार्थ्यांना प्रेरणादायी ठरली चाळीस वर्षांपूर्वी महाराष्ट्र पक्षिमित्र च्या रूपाने लावलेल्या पक्षिमित्र चळवळीचे आज मोठ्या वटवृक्षात रुपांतर झाले आहे शालेय पक्षिमित्र संमेलन हे या चळवळीचे यश आहे भविष्यात चांगले पक्षिमित्र घडवण्यासाठी प्रत्येक गावात शहरांमध्ये शाळा व कॉलेजमध्ये शालेय पक्षिमित्र संमेलनाचे आयोजन झाले पाहिजे हीच इच्छा आहे महाराष्ट्रातील प्रत्येक जिल्ह्यातील प्रत्येक तालुक्यातील प्रत्येक गावात प्रत्येक शहरात प्रत्येक उपनगरात अशा विद्यार्थी पक्षीमित्र संमेलनाची गरज आहे अशा शालेय स्तरावरील संमेलनातूनच आपल्याला भविष्यातील पक्षिमित्र पक्ष निरीक्षक पक्षी अभ्यासक पक्षी प्रेमी पक्षी प्रकाश चित्रकार पक्षी छायाचित्रकार बक्षीस संरक्षक व पक्षी संवर्धन अशी पिढी घडवता येईल असे मला मनापासून अंतकरणापासून वाढते कोल्हापूर शहरातील पहिले पक्षिमित्र विद्यार्थी संमेलन जानेवारी २०२६ ला भरविण्याचा आमचा मानस व प्रयत्नही सुरू आहे महाराष्ट्र राज्यात इथून पुढे भरवणाऱ्या सर्व स्तरावरील पक्षिमित्र संमेलनासाठी हार्दिक शुभेच्छा आमचे माझे मदतीचे हात सदैव आपल्या या कार्यासाठी तत्पर राहतील एवढी हमी देतो.

B-Balanced Flyer –संतुलितरित्या उडवणारे.

I -Intelligent in Navigation - दिशादर्शनातून दिशा मापणारा बुद्धिमान जीव

R-Romantic Natural- मुक्त भावना व्यक्त करणारे

D-Decorative Designer Nest Maker –सुंदर सुबक घरटी विणणारे

शब्दांकन

**डॉ. अनंत पाटील**

महाराष्ट्र पक्षिमित्र समन्वयक,कोल्हापूर





# पेंच सफर



**सौ. सीमा तंगडपल्लीवार**
पक्षी निरीक्षक,नाशिक

नुसते नाव ऐकले तरी शांतता आणि हिरवळ यांचा एक थंडगार अनुभव मनाला स्पर्शून जातो. पेंच-सफरीचा किती दिवसांपासून पडलेला पेच चुटकीसरशी सुटला, तो अमरावतीत झालेल्या 'महाराष्ट्र पक्षीमित्र संमेलन,' यामुळे आणि आमची लिटिल मास्टर-ब्लास्टर पुणेकर पक्षिमैत्रीण विदुलामुळे! तिने अगदी मनावर घेऊन सगळ्या जबाबदाऱ्या खांद्यावर सांभाळून सगळ्या गोष्टी नेटाने उत्तमरीत्या काटेकोरपणे पार पाडल्या. संमेलनाची नोंदणी, पेंचचे रिसॉर्ट बुकिंग, सफारी बुकिंग, पिकअप-ड्रॉप बुकिंग सगळे सगळे अगदी यथोचित पेलले. मूर्ती लहान पण..., अशी ही आमची मैत्रीण! संमेलन आटोपल्यावर लगेचच आम्ही पेंचसाठी रवाना झालो. पोहोचेस्तोवर रात्रीचे साडेनऊ झाले होते. आधीच सगळे बुकिंग झाले असल्याने गेल्यावर बॅग्स रूममध्ये टाकून जेवून घेतलं आणि आम्ही ताणून दिली. झोप तशी लागलीच नाही. सकाळी चारला उठून तयारीला लागलो. प्रचंड उत्सुकतेमुळे, एरव्ही आरामात कोणी तरी उठवले तर, उठणारी मी गज़र व्हायच्या आधीच उठून तयार झाले. साडेपाचला शार्प आम्ही खाली उतरलो आणि रिसॉर्टच्या कँटिनमध्ये चहासाठी बसलो. आमचे रिसॉर्ट 'तुरिया गेट'च्या अगदी दहा पावलांवर! फार सुंदर रिसॉर्ट होते. चहा घेऊन बाहेर येतो, तसे वाटले होते, आम्हीच गेटवर पहिले पोहोचलेले असू! पण, कसले काय. लंबीचौडी रांग, जिप्सींची आणि पर्यटकांची! गेटवर रिसिप्ट दाखवून जिप्सीत बसलो पण जिप्सी त्याने अर्धा पाऊण तास उशिरा सोडली .शेअरिंग जिप्सी बुक केली असल्याने तोंड बंद. येणारे आरामात आले. मस्त शाही झोप काढून, डोळे चोळत, नवीनच जोडपे ते! नव्या जोडप्यांनी अजिबात येऊ नये शेअरिंगमध्ये, आणि आमच्यासारख्या वेड्यांमध्ये तर अजिबातच नाही. बिचारे नुसते सेल्फी काढत होते. आमच्या डोळ्यांना, कॅमेऱ्याला अजिबात सवय नाही, या सगळ्या गोष्टींची. आजूबाजूला अनेक गोष्टी सुखावह असतानाही फार त्रासदायक झालं. कुठे बघावे कळत नव्हते. कधीतरी तर पुढे नजर जाणारच की हो, सतत काही आजूबाजूला बघणार नाही ना आम्ही ?ज असो! तर मंडळी, चालू झाली एकदाची आमची जिप्सी आणि उसळलेल्या उत्साहाच्या सागरात एकेक आनंदाच्या लहरी पडत गेल्या. तो निसर्ग, ती झाडे, ते वातावरण, त्या नद्या. तो वाघ, ती पक्षी मंडळी, ते हिरवेकंच जंगल, त्या निष्पर्ण 'घोस्ट-ट्री'च्या सावल्या. अहाहा!!! जसजसे एकेक पाऊल - जिप्सीचे - पुढे पडत होते, तसतसे निसर्गाची लाली अधिकच वाढत चालली होती. पेंचचे जंगल म्हणजे 'जंगल बुक'च्या पानांतून प्रत्यक्ष जीवनात उतरलेले एक स्वप्नवत जग, जिथे निसर्गाची प्रचंड शक्ती आणि सौंदर्य आपल्याला एका वेगळ्याच दुनियेत घेऊन जाते. पेंचचे जंगल म्हणजे जणू निसर्गाने आपल्या कुंचल्याने रेखाटलेले एक मनमोहक आणि जिवंत चित्रच! मध्यप्रदेश आणि महाराष्ट्राच्या सीमेवर वसलेले हे वन केवळ वाघांसाठीच नव्हे, तर त्याच्या विलक्षण नैसर्गिक सौंदर्यामुळेच असेल कदाचित, जगभर प्रसिद्ध आहे. हिरवा शालू पांघरलेले डोंगर, दूरवर नजर जाईल तिथे सागवान आणि इतर विविध वृक्षांच्या हिरव्यागार छटांनी नटलेले छोटे-मोठे डोंगर दिसत होते. हे दृश्य म्हणजे, जणू पृथ्वीने हिरवा शालू पांघरला आहे आणि त्यावर सकाळची सोनेरी सूर्यकिरणे पडत असता, नकळतच 'शालू हिरवा, पाचू नि मरवा, वेणी तिपेडी घाला,' हे गाणे ओठावर आले. पण, तेव्हा आमची मैत्रीण चारूलता चौधरी ही गायनात विशारद आहे हे माहित नव्हते. नाहीतर अजूनच अहाहा, झाले असते. जंगलाच्या मध्यभागातून वाहणारी पेंच नदी आणि तिचा तो शांत प्रवाह यामुळे या सौंदर्याला एक वेगळीच किनार लाभली होती. त्यावरील बारीकसारीक नक्षीकाम म्हणजे नदीचे संथ पाणी, किनाऱ्यावरील दगड आणि हिरवळ, आणि त्या पाण्यामध्ये आकाशाचे आणि झाडांचे पडलेले प्रतिबिंब! हे दृश्य मनाला शांती आणि डोळ्यांना इतका गारवा देत होते की, मला तर जिप्सीतून उतरून जवळ जाऊन बसून रहावे, असे वाटले. फोटोवरून ते कळेलच. विशेष म्हणजे, पाण्याच्या मध्यभागी एकही पान नसलेली झाडे आणि त्यावर कुठे कुठे बसलेली पक्षीमंडळी, या साऱ्या सौंदर्याचे रंग अजूनच खुलवत होते. हे मनोहर दृश्य कॅमेऱ्यात कैद करण्याची ओढच जणू मला लागली होती. आमच्या सोबत असलेले नवविवाहित जोडपे फारच घाई करत होते. ती एके ठिकाणी म्हणाली, इतके काय फोटो काढता, शेअर करत नाही का तुम्ही एकमेकांना? बोलावे, हसावे, रडावे का कानाखाली एकच द्यावी, कळेना. कुणाच्या, तर आमच्याच हो! कुणाच्या देणार? 'कप्पाळ माझं,' म्हणत ड्रायव्हरला म्हटले, चल रे बाबा. जंगल हे सेल्फीसाठी नाही हे आम्ही वेडे कोण समजवणार शहाण्यांना. आपल्याच मुस्कटात मारून घेतल्यासारखे निघालो.जंगल म्हणजे वन्यजीवांचे एक अद्भुत अनोखे घर! सकाळी-सकाळी अगदी सूर्योदयाच्या आधी गेटवर जमलेल्या असंख्य जिप्सी काही वेळातच वेगवेगळ्या मार्गांवर विखुरतात. सकाळी, दुपारी सफारी करताना चपळ गोंडस हरणांचे, चितळांचे कळप म्हणजे जणू कांचन मृगच! कांचनमृग बघून सीतामातेचे भान का हरपले, हे कळले नाही, तर जन्म व्यर्थ. हरणांच्या कळपाची

सुंदर लगबग खूप जवळून बघता आली. त्यांना त्यांच्या नैसर्गिक अधिवासात पाहाणे, हा एक रोमांचक आणि अविस्मरणीय अनुभव असतो. याआधी इतक्या जवळून लेकाकडे ह्युस्टनला बघितली होती. अगदी, हात लावून खाऊ-खाऊ घालून! विविध रंगांचे, तीनशेहून अधिक प्रजातींच्या पक्ष्यांचे थवे इथे किलबिलाट करीत असतात. म्हणजे, तशी आजवर नोंद झाल्याचे गाईडने सांगितले. आम्हाला चार सफारीफेऱ्या मिळून साठ ते सत्तरहून अधिक पक्ष्यांच्या प्रजाती पाहायला मिळाल्या. त्यांचा तो किलबिलाट म्हणजे, पहाटेच्या ललित रागातील गायनच जणू! भृंगराज कोतवाल (ग्रेटर रॅकेट-टेल्ड ड्रोंगो), हळद्या, तांबट, आणि अजून इतर बऱ्याच मंडळींचे गायन ऐकून कान तृप्त झाले. जंगलात एक खास, मातीचा आणि पानांचा सुगंध जाणवत होता. जो मनाला अगदी आतून भिडत होता. खऱ्या अर्थाने मी त्या निसर्गाच्या कुशीत लोळत होते. शहराच्या गोंधळापासून दूर एक गहन शांतता अनुभवता येत होती, तशी मी नेहमीच अनुभवत असते. ही शांतता खूप बोलकी, सच्ची होती. ती मला निसर्गाच्या भव्यतेची आणि जीवनाच्या साधेपणाची जाणीव करून देत होती. सकाळच्या सोनसळीच्या किरणांत न्हाऊन निघालेली जंगलातील भटकंती म्हणजे एक गूढ आणि रोमांचक अनुभव, सगळ्यांनीच घेऊन बघण्यासारखा!जंगल म्हणजे मनाला शांती देणारे माझे हक्काचे ठिकाण. इथे फक्त निसर्गाचा, हवेचा, पाण्याचा, आणि वन्यजीवांचा आवाज असतो. या नैसर्गिक एकांतवासात जीवनातील तणाव कमी होऊन एक नवी ऊर्जा मिळते. पहाटेची सोनेरी शांतता अनुभवण्यासारखी असते. रोज ठरवूनसुद्धा ते घडत नाही. त्यासाठी वेगळे नि अथक परिश्रम घ्यावे लागतात. पण, जंगलासाठी मला वेगळे परिश्रम घ्यावे लागत नाहीत, हेच माझ्या यशाचे गमक निसर्गराजाने मला दिलेले! जंगल म्हणजे केवळ झाडे आणि प्राणी; यासाठी नाहीत, तर ते एक जिवंत काव्य आहे. म्हणून ते ऐकायला, वाचायला तिथे जायचे असते, जिथे प्रत्येक क्षण निसर्गाची महती सांगतो. कुठल्याही जंगलात फिरताना, खास करून पेंचच्या जंगलात सकाळच्या प्रकाशात झाडांच्या पानांवरून खाली येणारी कोवळी सूर्यकिरणे आणि मातीचा मंद मंद सुगंध, मन प्रसन्न करते. सफारीच्या वेळी होणारी थोडीशी धाकधूक आणि अचानक वाघाचे दर्शन होण्याची आशा, ही एक थरारक अनुभूती असते. ती अनुभवता आली, तर आली. आणि ज्याने ती अनुभवली त्यालाच त्यातली मजा कळेल.जंगलात बरेच लोकं फक्त वाघ बघायला जातात, फोटो काढतात स्टेट्स आणि इतरत्र पोस्ट करतात. पण, त्या एका वाघासाठी, त्याच्या जीवासाठी फॉरेस्टमधील किती लोकांना आपला जीव पणाला लावावा लागतो, हे मला बघायला मिळेल याची जराशी वा पुसटशीही कल्पना नव्हती. हा अनुभव आता सांगते.आम्ही तसे अगदीच, वाघ बघायला गेलो, असे नाही. पण, वाटत होते निदान जराशी तरी झलक मिळावी बघायला. पहिल्या सफारीत शेपूट दाखवून हातावर नव्हे, नव्हे कॅमेऱ्यावर तुरी देऊन गेला बेटा; कदाचित बेटी. झाला न राव मूड ऑफ, हिरमुसलो, गहिवरलो. पण, क्षणात क्रेस्टेड हॉक ईगल ने अशी काही पोझ दिली, की सब मायाजाल झूट! हीच तर जंगलाची खासियत; दुसऱ्या क्षणाला ओंजळ भरतो तो! पक्षी, जंगल, निसर्ग यासोबत वाघ पण हवा असतो आणि तो आम्हालाही हवा होता पण अट्टाहास नव्हता. भेटला तर भेटला, नाही तर नाही. पण अखेरीस भेटला, नव्हे भेटले, ते पण विलक्षण अद्भुत प्रसंगामुळे! मी अनेकदा म्हटले आहे, लिहिले आहे की, जंगलात फक्त वाघांसाठी जायचे नसते. जंगल वाचता यायला हवे, त्याचा घोट नि घोट, फुरके मारत-मारत पिता यायला हवा, त्याची प्युरिटी निरखत-निरखत, आत खोलवर साठवता यायला हवी. निर्मळ श्वास घेता यायला हवा. हे सगळं साधलं की मग काय? फक्त.. अहाहा!!! हे, नुसते लिहितानाही मन भावविभोर जर होत आहे, तर कल्पना करा की, मी किती ओतप्रोत भरून गेले असेन, जंगलाने दिलेल्या प्रत्येक कणाकणाने. घनदाट सागवान, ऐन, हळदू, तेंदू, हिरडा, पळस यांचे वृक्ष, नागमोडी वाहाणाऱ्या नद्या आणि नयनरम्य गवताळ कुरणे, गुलाबी रंगाची तुरे सर्वत्र पसरलेली होती, यामुळे अभयारण्याचे निसर्ग सौंदर्य अधिक खुलत होते, नावातच त्याच्या सौंदर्याची व्याप्ती कळेल, 'दीनानाथ,' नाव त्या गवताचे! याचे गवत प्राण्यांसाठी चारा म्हणून फार उपयोगी आहे. आदरणीय दीनानाथ मंगेशकर, त्यांच्या महान कार्याची आठवण आणि या गवताचे उत्कृष्ट गुणधर्म (जसे की, सतत हिरवीगार राहाण्याची आणि जास्त प्रमाणात वाढण्याची क्षमता) यांच्यात एक प्रकारे साम्य दर्शवते म्हणून हे नाव दिले असावे. त्यांच्या कार्याचा आदर म्हणून कृषीवैज्ञानिकांनी हे नाव दिले असावे का? केवळ निसर्गच नाही, तर पेंचला ऐतिहासिक महत्त्वही आहे, कारण, 'द जंगल बुक'मधील 'मोगली,' आणि त्याच्या प्राण्यांच्या कथा याच भागातील जंगलावर आधारित आहेत. 'किपलिंग,' यांनी त्या परिसरातील वर्णनासाठी आणि वन्यजीवनासाठी अनेक निसर्ग-इतिहासकारांच्या पुस्तकांचा आधार घेतला होता; जसे की, रॉबर्ट आर्मिटेज स्टेरन्डेल यांचे 'सीओनी' (Seonee). 'द जंगल बुक'मध्ये उल्लेख केलेली अनेक ठिकाणे ही याच सिवनी जिल्ह्यातील वास्तविक ठिकाणे आहेत.'सीओनी हिल्स, वैनगंगा नदी, कान्हिवडा गाव.' याबद्दल आणखी विस्तृत माहिती गुगलवर बघू शकता. साहस, शांतता किंवा निसर्गाशी अनोखे नाते जोडण्याची संधी शोधत असाल, तर पेंच व्याघ्र प्रकल्प हा एक अविस्मरणीय अनुभव देणारे ठिकाण आहे. मला वाटते, इथे आलेला प्रत्येक माणूस या पवित्र सौंदर्यासमोर नतमस्तक होईल, आणि तसा तो व्हायलाच हवा. हे जंगल फक्त बघण्याचे ठिकाण नाही, तर ते अनुभवण्याचे, मनात साठवण्याचे आणि स्वतःला शोधण्याचे ठिकाण आहे.

# महाराष्ट्रातील पक्षीसप्ताह

शब्दांकन -**माणिक पुरी**

दिनांक ०५ नोव्हेंबर ते १२ नोव्हेंबर २०२५ दरम्यान महाराष्ट्रात पक्षीसप्ताह उत्साहात साजरा करण्यात आला. वनविभाग, अनेक संस्था, पक्षनिरीक्षक, पक्षीअभ्यासक यांनी पक्षीनिरीक्षण करून वेगवेगळ्या परिसरात आढळून आलेल्या पक्ष्यांच्या नोंदी घेतल्या आहेत ही एक महत्त्वाची नोंद ठरली आहे.

अरण्यऋषी कै. मारुती चितमपल्ली यांचा जन्मदिवस ५ नोव्हेंबर ते डॉ. सालीम अली यांची जयंती १२ नोव्हेंबर यादरम्यान संपूर्ण महाराष्ट्रभर पक्षीसप्ताह उत्साहात साजरा केला जातो. पक्षीसप्ताह निमित्त घेतलेल्या विविध उपक्रमाची माहिती संकलित करण्याचे काम महाराष्ट्र पक्षमित्र संघटनेतर्फे करण्यात आले आहे.

दृष्टीहिनांसाठी पक्षीनिरीक्षणाची संधी उपलब्ध करून दिल्याबद्दल अमरावती येथील 'वन्यजीव व पर्यावरण संवर्धन संस्था' आणि महाराष्ट्र पक्षीमित्र संघटनेचे मनःपूर्वक अभिनंदन. अमरावती येथील बांबू गार्डन येथे दृष्टीहिनांसाठी पक्षीनिरीक्षण या अनोख्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या उपक्रमात ४५ दृष्टिहीन विद्यार्थ्यांनी पक्ष्यांचे आवाज व पिसांच्या स्पर्शाने पक्षीविश्व अनुभवले आहे. दृष्टीहीन मुलांच्या आयुष्यात उजेड पेरण्याचं काम पक्षीसप्ताहनिमित्त करण्यात आले. तसेच महाराष्ट्र पक्षीमित्र संघटनेचे अध्यक्ष डॉ. जयंत वडतकर यांनी महाराष्ट्र टाइम्सच्या विशेष पुरवणीत 'पाणथळ' नष्ट होण्याच्या मार्गावर याविषयी सखोल चिंतन करून लेखन केले आहे.

'सारस वन्यजीव व पर्यावरण संवर्धन संस्था जिंतूर, परभणी' या संस्थेकडून पक्षीसप्ताहात पाणथळ पक्ष्यांचे सर्वेक्षण करण्यात आले. यावेळी संस्थेचे अध्यक्ष विजय ढाकणे, सचिव अनिल उरटवाड, उपाध्यक्ष ज्ञानेश्वर गिराम सोबतच माणिक पुरी, गणेश कुरा, चंद्रमुनी वाकळे, माधव गव्हाणे या सर्वेक्षण मोहिमेत सहभागी झाले होते. निवळी तलावालगत ८३ पक्ष्यांच्या नोंदी करण्यात आल्या. सोबतच परभणी जिल्ह्यातील पक्षीसूची तयार करण्यात आली असून ती लवकरच प्रकाशित करण्यात येणार आहे.

स्थलांतरित पक्ष्यांसाठी अहिल्यानगर जिल्ह्यातील कापूरवाडी येथील तलाव हक्काचे ठिकाण आहे असे मत पक्षीअभ्यासक डॉ. सुधाकर कुऱ्हाडे यांनी मांडले आहे. त्यांनी 'चला पक्षी पाहूया' या उपक्रमाचे आयोजन येथे करण्यात आले. निसर्ग मित्र मंडळ संस्थेने महाराष्ट्र पक्षीमित्रांच्या सहकार्याने पक्षीसप्ताह निमित्त पक्षी निरीक्षणाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला. या निरीक्षणातून विविध जातीचे ३५ प्रकारचे पक्षी आढळून आले आहेत.

अमरावती येथील म. न. पा. उच्च प्राथमिक मराठी शाळा क्रमांक १८ येथील विद्यार्थ्यांना पक्षीअभ्यासक किरण मोरे आणि सुमित अंबुलकर यांनी पीपीटीच्या माध्यमातून पक्ष्यांची ओळख करून दिली.

अंबाझरी तलाव, नागपूर येथे डॉ. राजू कसंबे, शलाका पागे, विनय वेनुरकर व संजीव शेंडे यांनी पक्षीनिरीक्षण कार्यशाळा आयोजित केली होती. अंबाझरी परिसरात पक्षीनिरीक्षण करण्यात आले. मधुबाज गरुड आणि लेसरव्हाइट थ्रोट यांच्या नोंदी घेण्यात आल्या ही विशेष बाब!

आगरकर विद्या भवन हिंगणघाट येथे पक्षीसप्ताह निमित्त 'पक्षी आणि घरटी' हा कार्यक्रम घेण्यात आला. या कार्यक्रमातून विद्यार्थ्यांना पक्ष्यांच्या घरट्याची वैज्ञानिक माहिती देण्यात आली असे मत प्रवीण कडू यांनी मांडले.

'मी लोणारकर टीम' च्या वतीने पक्षीअभ्यासक संजीव अत्रे यांच्याशी मुक्त संवाद साधला. दुसऱ्या दिवशी 'धार यज्ञेश्वर मंदिर' परिसरात पक्षीनिरीक्षण करण्यात आले. त्यामुळे लोणार अभयारण्यातील पक्षीवैभव महाराष्ट्राला कळू लागले.

महाराष्ट्र पक्षीमित्र, पुणे विभागातर्फे तसेच स्काय फाउंडेशन आणि कॉलेज ऑफ कम्प्युटर सायन्स, वाकड पुणे यांच्या वतीने पक्षीसप्ताह साजरा करण्यात आला. यावेळी डॉ. कैलास बगडाने यांनी दुर्मिळ व संकटग्रस्त पक्ष्यांच्या प्रजातींची ओळख करून दिली.

पक्षीसप्ताह निमित्त 'अलाईव्ह चॅरिटेबल ट्रस्ट' तर्फे पाषाण येथील पंचवटी टेकडीवर विशेष पक्षीनिरीक्षण उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते अशी माहिती उमेश वाघेला यांनी दिली आहे.

नांदेड येथील संजय कोंपलवार, श्यामसुंदर टाक, सदा वडजे यांनी पक्षीसप्ताह निमित्त नांदेड परिसरात पक्षीनिरीक्षण करून जिल्ह्यात नव्याने आढळणाऱ्या पक्ष्यांच्या नोंदी घेतल्या.

उद्याच्या सुंदर दिवसांसाठी पक्षीवैभव समृद्ध करणाऱ्या सर्व पक्षनिरीक्षकांचे, अभ्यासकांचे मनःपूर्वक धन्यवाद आणि पुढील वाटचालीस खूप शुभेच्छा.

*****

# भावपूर्ण श्रद्धांजली



महाराष्ट्र पक्षिमित्रचे आजिवन सभासद गोंदिया येथील **भरतभाई जसाणी** यांचे दिनांक १८ नोव्हेंबर २०२५ रोजी हृदयविकाराच्या धक्क्याने दुःखद निधन झाले. नुकतेच ते अमरावती येथील संमेलनात उपस्थित होते व मेळघाट पक्षी निरीक्षण सहलीत सुद्धा सहभागी झाले होते.

*****

पक्षी सप्ताहानिमित्त...

# आमच्या घरामागील परिसर, एक मिनी बर्ड सेंक्चुरी



**आशिष बंड,**
महाराष्ट्र पक्षिमित्र सदस्य, कारंजा.

आमच्या घरामागील परिसर म्हणजे एक छोटेसे पक्षी अभयारण्यच आहे, असे म्हटल्यास काही हरकत नसावी. परिसरात असलेल्या विविध प्रकारच्या झाडाझुडपांमुळे अनेक प्रकारची पक्षी येथे वर्षभर बघायला मिळतात. माझ्या घराची गॅलरी नेमकी त्याच बाजूने असल्याने समोरील झाडी असलेला परिसर आणि खाली असलेला आमचा छोटासा बगीचा यांमधील असलेले विविध पक्षांचे अस्तित्व आम्हाला सतत जाणवत असते. त्यांचे आवाज, उडणे, बागडणे, खाणे, पिणे, घरटे करणे, पिल्लांचे संगोपन, इत्यादी सर्व गोष्टींचे निरीक्षण करणे आमच्या दैनंदिनीचा एक भाग झाले आहे. फक्त मी एकटाच पक्षिमित्र नव्हे तर आमच्या घरातील सर्वच पक्षिमित्र किंवा पक्षिनिरीक्षक झालेले आहेत. ते पक्षी-अभ्यासक जरी नसले तरी पक्ष्यांबद्दल आवड, माहिती, आस्था व एक संवेदनशील नाते सर्वांचे तयार झाले आहे. कुठलाही नवीन पक्षी, पक्ष्यांची घरटी, त्यांची पिले, त्यांना भरवणे, त्यांचे आवाज याची नियमित चर्चा आमच्या कुटुंबात सुरू असते. चिमण्या तर, आमच्या कुटुंबाचा एक भागच बनल्या आहेत. कारण त्यांचा वावर हा बागेतून थेट आमच्या गॅलरीत, खिडकीत, घरात नित्य झालेला आहे. चिमण्यांसोबत बुलबुल, मैनासुद्धा कधीकाळी हे धाडस करतात. चिमण्यांसाठी विशेष सुविधा म्हणून आम्ही घरच्या गॅलरीत आणि पार्किंगमध्ये कृत्रिम पुठ्यांचे घरटे तयार करून लावलेले आहेत. त्यासाठी अगदी स्पर्धा करून त्यांनी आपले कायम बिऱ्हाड तेथे पक्के केले आहे. चिमण्यांच्या अनेक पिढ्या तिथे तयार झालेल्या आहेत आणि होत आहेत. चिमणीसंवर्धनात हा सहज केलेला आमचा प्रयत्न यशस्वी झालेला आहे. समोरील झाडीत जवळपास तीस प्रकारच्या पक्ष्यांच्या प्रजाती बघण्याची नोंद मी केलेली आहे; तर इतर वीस प्रकारचे पक्षी हे वर्षभरात अधूनमधून दिसून येतात. त्यात सामान्यपणे नियमित दिसणारे, अधूनमधून दिसणारे आणि स्थलांतर करून येणारे असे विभाजन आम्ही केले आहे.

यातील नियमित दिसणारे पक्षी असे- चिमणी, कावळा, बुलबुल, वटवट्या, शिंपी, शुभ्र कंठी, सुगरण, भारद्वाज, कोकिळ, दयाळ, चिरक, पारवा, कबूतर, खंड्या, ढोकरी, गाय बगळे, चंडोल, साळुंकी, पाकोळी, खाटिक, टोया पोपट, पोपट, कोतवाल, सातभाई, शिंजीर, टिटवी, ठिपक्यांची मनोली, इत्यादी. तर, मधूनच केंव्हातरी हजेरी लावणारे पक्षी- चष्मेवाला, सुभग, शिक्रा, नाचण, मोर, हळद्या, सुतार, पिंगळा, हरीयाल, निळा खंड्या, थिरथिरा, धनेश, करण पोपट, जंगली मैना, कापशी घार, कुवाक कोंबडी, रंगीत तितीर, पट्टेरी बटलावा, तांबट, इत्यादी. तसेच, स्थलांतरित पक्षी- पावशा, वेडा राघू, चातक, परिट, कारुण्य कोकिळा, निळा कस्तुर, पळस मैना, इत्यादी स्थलांतरित पक्षी आमचेकडे बघायला मिळतात. म्हणजे, जवळपास पन्नास-पंचावन्न प्रकाराचे पक्षी, आम्ही फक्त घरून वर्षभरात बघतो.

इतक्या पक्ष्यांनी समृद्ध असलेला आमचा हा परिसर म्हणजे पक्षांचे एक छोटेसे अभयारण्यच आहे, असे मला वाटते. त्यांना न्याहाळणे, त्यांच्या हालचाली, रंगरूप, सवयी, नेस्टिंग, पिलांचे संगोपन, अधिवासासाठी किंवा खाण्यासाठी स्पर्धा, चुरस, सामाजिक एकोपा, एकमेकांना सावध करणे, एकमेकांची मदत करणे, इत्यादी गोष्टी पाहाणे आम्हाला नित्याचे झाले आहे.

या छोट्याशा जंगलामध्ये आम्ही नियमित फेरफटका मारीत असतो. टेरेसवरूनसुद्धा द्वीनेत्रीने पक्ष्यांचे सर्वांगीण निरीक्षण सुरू असते. वेगवेगळ्या ऋतूंतील त्यांचे वेगळेपण आम्हाला जाणवते. त्यांच्या अनेक गमतीजमतीसुद्धा बघावयास मिळतात. पावसाळ्याच्या सुरुवातीपासून सुगरण पक्ष्यांचे थवे इथे बघावयास मिळतात. भरपूर प्रमाणात असलेल्या बाभळीझाडांच्या फांद्यांना त्यांची घरटी तयार करण्याची लगबग सुरू दिसते. त्यांच्यासोबत शुभ्रकंठी मनोल्यासुद्धा थव्याने इथे चरायला येतात. ठिपक्यांच्या मनोल्या लांब गवताचे पाते घेऊन उडताना दिसतात. पावशा, चातक, कारुण्य कोकिळा आपल्या तीव्र आवाजाने आसमंत गाजवतात. मोठा रंगीत तितीर झुडुपातून आपला कर्णकर्कश टाहो फोडत असतो. मध्येच, मोर आपला लांब पिसारा घेऊन दर्शन देऊन जातो. बागेतील रुंद पानाच्या झाडात शिंपी पक्ष्याचे पाउचसारखे घरटे शिवलेले आढळते. सुभग पक्ष्याची जोडी सकाळी सुंदर शीळ वाजवित झाडांवरील छोटे किडे टिपताना या फांदीवरून त्या फांदीवर उड्या मारताना आढळते. मध्येच, भारद्वाज आला की छोटे पक्षी व चिमण्या एकत्र येऊन आवाज करतात. सरडे बागेतून पळताना दिसतात. तसेच, शिक्रा आल्यावरसुद्धा, सातभाई व इतर पक्षी कर्कश आवाज करून इतर पक्ष्यांना सावध करतात. बागेतील खारसुद्धा झाडाच्या शेंड्यावर जाऊन शेपटी उडवून ओरडत राहाते. कोतवाल त्याचा पाठलाग करून त्याला दूर पळवतो. उन्हाळ्यात टिटवी आपले छोटी छोटी पिले घेऊन मोकळ्या जागी फिरत असते. तीसुद्धा धोका बघून जोरात ओरडते. पंख तुटल्या गत जमिनीवर पसरते. मुंगूस, कुत्री, कधी साप बघून सर्वांना सावध करते. बागेतील जास्वंदाच्या झाडात बुलबुल घरटे करतो. दयाळ, वटवट्या, पोपट यांचे आवाज सतत येत राहतात. तोया पोपट झाडांवर पाच-सहाच्या संख्येने येऊन टिवटिवाट करीत उडतात बसतात. उन्हाळ्यात पाण्याची कमतरता जाणवते. उष्णताही खूप वाढलेली असते म्हणून झाडांच्या फांद्यांना आम्ही पाण्याची भांडी लटकवतो. दिवसभर अनेकविध पक्षी पाणी पिण्यास इथे हजेरी लावतात. हिवाळ्यात वेडा राघू, परिट, थिरथिरा परिसरात टिपताना दिसतात. पळसाच्या फुलांसाठी पळस मैना थव्याने येतात. आकाशातसुद्धा सायंकाळी मनोहारी दृश्य त्या साकारतात. असे अनेकविध पक्षी वर्षभर आम्ही येथे बघतो. जेव्हा-केंव्हा आमच्या दैनंदिनीतून वेळ मिळतो, तेव्हा त्यांच्या या अविरत चालणाऱ्या विश्वाचे दर्शन आम्हाला घरबसल्या होते.

सदैव आनंदी राहाणे, मंजुळ गाणी गाणे, सर्व मिळून एकत्र राहाणे, एकमेकांना मदत करणे, सुंदर घरटी तयार करणे, पिलांचे संगोपन करणे, जोडीने राहाणे, इत्यादी गोष्टी आम्ही त्यांच्याकडून शिकत असतो. अशा पक्ष्यांच्या सुंदर परिसरात आम्ही राहातो आणि त्यांना अभय देतो.

# अमरावतीची 'सिटी बर्ड' निवडणूक
# अमरावती शहराचा शहर पक्षी म्हणून तांबटची निवड

आपल्या देशाचे व राज्याची जशी मानचिन्ह असतात तसा अमरावती शहराचा 'सिटी बर्ड असावा अशी संकल्पना अमरावती येथील वन्यजीव पर्यावरण संवर्धन संस्थेच्या (WECS) वतीने अमरावतीकरांसमोर मांडण्यात आली होती. ही निवडणूक अधिकृत व्हावी या दृष्टीने वेक्स कडून अमरावती महानगरपालिकेत तसा प्रस्ताव देण्यात आला. या निवडणुकीची संकल्पना मनपा आयुक्त यांच्यासमोर मांडण्यात आली. त्यास मनपा आयुक्त मा. सौम्या शर्मा यांनी उत्साहपूर्ण होकार दर्शविला व माझी वसुंधरा अभियान ६.०' अंतर्गत शहराचा अधिकृत 'सिटी बर्ड' निवडण्याकरिता निवडणूक प्रक्रिया घेण्याचे ठरले.

या निवडणुकीत उमेदवार असलेले पक्षी हे अमरावती शहरात दिसणारे व पर्यावरणात विशेष महत्त्व असलेले असे पक्षी उमेदवार अमरावती मधील सर्व पक्षी अभ्यासक व अनेक संस्थांच्या समन्वयातून ठरविण्यात आले होते. यामध्ये अमरावतीच्या जैवविविधतेचे प्रतिनिधित्व करणाऱ्या सहा पक्ष्यांची निवड केली आहे. यामध्ये राखी धनेश हा पक्षी मोठ्या झाडांवर आढळणारा, फळांद्वारे बीजप्रसार करणारा जंगलाचा शेतकरी असे त्याचे महत्त्व आहे. दुसरा तांबट हा पक्षी उक्क उक्क आवाजासाठी प्रसिद्ध, उंबर व वडाची फळे खाणारा, लहान, रंगीबेरंगी आणि शहरात सहज सर्वत्र दिसणारा पक्षी. तिसरा हुदहुद नावाचा पक्षी हा लांब चोच व डौलदार तुरा असलेला पक्षी मोकळ्या जागांवर, सहज पाहायला मिळतो, जमिनीतील उधळी व कीडे हे त्याचे खाद्य आहे. रात्री वावरणारा घुबड प्रजाती मधील ठीपकेवाला पिंगळा हा आपले घरटे झाडांच्या पोकळीत तयार करून राहतो; उंदीर खातो म्हणून शेतीसाठी तो उपयुक्त आहे. शिक्रा हा चपळ शिकारी पक्षी असून; शहरात नियमितपणे दिसतो. भारव्दाज : लांब शेपूट, लाल डोळे; जमिनीवर झुडपात फिरणारा चोरून शिकार करणारा पक्षी, अशा ६ पक्ष्यांना उमेदवार म्हणून निवडण्यात आले होते.

त्यानंतर या पक्षी निवडणुकीची घोषणा दि. १-२ नोव्हेंबर २०२५ रोजी अमरावती येथे मध्ये पार पडलेल्या ३८ व्या महाराष्ट्र पक्षिमित्र संमेलनात मान्यवरांच्या उपस्थितीत करण्यात आली होती. यामध्ये ऑनलाईन निवड प्रक्रिया दि. १८ ते २८ नोव्हेंबर दरम्यान राबविण्यात आली. शहराचे प्रतिनिधित्व करणारा पक्षी निवडण्याची संधी अमरावतीकरांना प्रथमच मिळाल्यामुळे नागरिकांमध्ये प्रचंड उत्साह होता. यामध्ये अमरावती मधील वृत्तपत्रांनी या निवडणुकीला मोठ्या प्रमाणात प्रसिद्धी दिल्याने हि निवडणूक प्रचंड चुरशीची झाली होती. शहर पक्षी निवडण्याकरिता वेक्स व महापालिकेच्या संकेतस्थळावर आणि अधिकृत सोशल मीडिया हँडलवर मतदानासाठीची लिंक उपलब्ध करून देण्यात आली होती. या प्रक्रियेची माहिती नागरिकांपर्यंत पोहोचविण्यासाठी व पक्ष्यांची जनजागृती करण्यासाठी विविध शाळा व महाविद्यालये येथे वन्यजीव पर्यावरण संवर्धन संस्थेकडून शहरात वेगवेगळ्या ठिकाणी व गर्दीच्या ठिकाणी जनजागृती कार्यक्रम राबविण्यात आले.

ऑनलाईन पद्धतीमधे पार पडलेल्या या निवड प्रकियेत एकूण ४५४५ ईतक्या नागरीकांनी आपला सहभाग नोंदविला. या निवडणुकीच्या निकालाची घोषणा दि. ३० नोव्हेंबर रोजी सकाळी वेलकम पॉइंट येथे पार पडलेल्या हॅपी स्ट्रीट कार्यक्रमात करण्यात आली. महानगरपालिका आयुक्त माननीय सौम्या शर्मा, पोलिस उपायुक्त मा. गणेश शिंदे आणि पोलिस उपायुक्त मा शाम घुगे साहेब, मनपा उपायुक्त श्री. नरेंद्र वानखडे यांचे उपस्थितीत वेक्स संस्थेचे सचिव डॉ जयंत वडतकर यांनी या निवडणुकीचा निकाल वाचून दाखवला व त्यानंतर मनपा आयुक्त मा. सौम्या शर्मा यांनी तांबट या पक्ष्याचे नाव शहर पक्षी म्हणून घोषित केले. यामध्ये झालेल्या एकूण ५४४५ पैकी सर्वात जास्त म्हणजे १४१४ इतक्या लोकांनी तांबट (Coppersmith Barbet) या पक्ष्याला आपली पसंती दर्शविली. त्यानंतर १०३२ मतांसह दुसऱ्या क्रमांकावर भारद्वाज राहीला. राखी धनेशाला ९९८, हूदहूद ला ७९६, पिंगळा ६५५ तर शिक्रा पक्ष्याला ५५१ मते मिळाली. यावेळी मंचावर वेक्सचे कोषाध्यक्ष डॉ गजानन वाघ, सहसचिव डॉ मंजुषा वाठ, सदस्य किरण मोरे, सौरभ जवंजाळ, अँड राजमेहेर निशाने, डॉ. पवन राठोड, प्रशांत निकम, आनंद मोहोड, अभिषेक पाटील, संकेत राजूरकर, दिपाली बाभूळकर यांची उपस्थिती होती. या संपूर्ण प्रक्रियेत श्री. करण पारेख यांचे समन्वयक म्हणून वेक्सला महत्त्वाचे सहकार्य लाभले. या संपूर्ण प्रक्रियेत उपायुक्त श्री. नरेंद्र वानखडे व श्री. करण पारेख यांचे वेक्सला महत्त्वाचे सहकार्य लाभले. हा उपक्रम केवळ शहर पक्षी निवडण्यासाठीच नव्हे तर पक्षी संवर्धन व पर्यावरण जागरूकता वाढवण्यासाठी महत्त्वाचा टप्पा ठरला. या पक्षी निवडणुकीत वन्यजीव व पर्यावरण संवर्धन संस्थेच्या श्री. सौरभ जवंजाळ, अँड राजमेहेर निशाने, डॉ.अनिरुद्ध देशमुख, डॉ. नंदकिशोर बोंडे, प्रशांत निकम, सुमित अंबुलकर, आनंद मोहोड, अभिषेक पाटील, संकेत राजूरकर, आकाश धोत्रे आदी सदस्य व स्वयंसेवकांनी जनजागृती साठी विविध उपक्रमांचे आयोजन करुन महत्त्वाचे योगदान दिले.



# ३८ वे महाराष्ट्र राज्य व तिसरे अखिल भारतीय पक्षिमित्र संमेलन अहवाल

महाराष्ट्र पक्षीमित्र संयोजित २०२५ चे ३८ वे महाराष्ट्र राज्य तथा तिसरे अखिल भारतीय पक्षिमित्र संमेलन अमरावती येथे वन्यजीव व पर्यावरण संवर्धन संस्थेच्या यजमानपदाखाली दि. ०१ आणि ०२ नोव्हेंबर २०२५ दरम्यान संपन्न झाले. अमरावती येथील संत ज्ञानेश्वर सांस्कृतिक सभागृहात पार पडलेल्या संमेलनाच्या उद्घाटन सोहळ्यास संमेलनाध्यक्ष म्हणून निवृत्त प्रशासकीय अधिकारी तथा मित्रा या राज्य नियोजन संस्थेचे अध्यक्ष माननीय मुख्यमंत्री यांचे आर्थिक सल्लागार मा. प्रवीणसिंह परदेशी (IAS Rtd.) तर उद्घाटक म्हणून प्रधान मुख्य वन्यजीव संरक्षक श्री श्रीनिवास रेड्डी, मुख्य अतिथी आदरणीय सौम्या शर्मा, आयुक्त, महानगरपालिका अमरावती, माजी महापौर मिलिंद चिमोटे या कार्यक्रमाला उपस्थित होते. महाराष्ट्र पक्षीमित्रचे अध्यक्ष डॉ जयंत वडतकर, माजी संमेलनाध्यक्ष श्री अनिल माळी, संमेलन आयोजन समितीचे अध्यक्ष डॉ. गजानन वाघ, स्वागताध्यक्ष डॉ अंजली देशमुख, सहसचिव डॉ. मंजुषा वाठ, उपाध्यक्ष श्रीकांत वऱ्हेकर हे देखील व्यासपीठावर उपस्थित होते. या संमेलनासाठी संपूर्ण राज्यातून व राज्याबाहेरून ३०० प्रतिनिधी उपस्थित होते.

संमेलनाध्यक्ष मा. प्रवीणसिंह परदेशी यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणात महाराष्ट्र पक्षीमित्र चळवळ ही आपल्या राज्याची मोठी उपलब्धी असल्याचे सांगून मला या चळवळी सोबत जुळण्याची संधी ३० वर्षांपूर्वी याच अमरावती शहरापासून मिळाली होती. व आज याच शहरात होणाऱ्या ३८ व्या महाराष्ट्र पक्षीमित्र संमेलनाचे अध्यक्ष होण्याचा बहुमान प्राप्त झाला हे माझे भाग्य समजतो असे सांगितले. पक्षी संवर्धना बाबत आपण कितीही अनभिज्ञ असलो तरीही, पक्षी संवर्धनाचा मुद्दा हा मानवी अस्तित्वाशी निगडित आहे. पक्षी संवर्धनाकरिता ग्रामीण भागातील विविध जमातींना एकत्रित करावे लागेल, ज्यांची उपजीविका निसर्गावर अवलंबून आहे. उदा. मासेमारी, बकरी पालन, शेती इत्यादी. या जमातींना एकत्रित करून अधिवास वाचविण्याकरिता नक्कीच मदत होईल असे मत व्यक्त केले.

संमेलनाचे उद्घाटक मा. श्रीनिवास रेड्डी यांनी आपल्या उद्घाटनपर भाषणात पक्षीमित्र चळवळीचे कौतुक करून वनविभाग भविष्यात देखील अशा प्रकारच्या चळवळीस त्यांच्या वतीने मदत करण्यास तत्पर राहील, आपण सुद्धा पुढे येऊन वन विभागास सहकार्य व समन्वय ठेवावा असे आवाहन केले. म.न.पा. आयुक्त मा. सौम्या शर्मा–चांडक यांनी आपल्या मनोगतात–वाढती लोकसंख्या आणि शहरीकरणामुळे जे विकासाचे प्रारूप आपल्याला स्वीकारावे लागले आहे तरीही, त्या त्या परिसरातील पक्ष्यांच्या संवर्धनासंबंधी धोरणात्मक निर्णय शासनाच्या माध्यमातून काटेकोरपणे राबविणे गरजेचे आहे. शहरातील पक्ष्यांच्या जनजागृती साठी अमरावती महानगरपालिका आणि वेक्स संस्थेच्या संयुक्तपणे राबविली जाणारी शहर पक्षी निवडणूक यासाठी महत्वाची ठरेल असे मत व्यक्त केले. यावेळी शहर पक्षी निवडणुकीतील पक्षी उमेदवारांची नावे मान्यवरांच्या उपस्थित मंचावरून घोषीत करण्यात आलीत व निवडणूक प्रक्रिया लवकरच सुरु होणार असल्याचे म.न.पा. आयुक्त सौम्या शर्मा यांनी जाहीर केले.

माजी महापौर श्री मिलिंद चिमोटे यांनी आपल्या भाषणात निसर्गातील एका घटकासाठी स्वतःचे आयुष्य झोकुन देणाऱ्या अशा पद्धतीच्या पक्षीमित्रांचे कौतुक केले. वेक्सच्या टीम सोबत मी २० वर्षांपूर्वी जुळलो, राजकारणात राहून पर्यावरणाचा विचार करणे शक्य होत नाही मात्र वेक्स संस्थेच्या विविध उपक्रमात सातत्याने सहभागी होत राहिल्याने हिरवा विचार नेहमीच जिवंत राहिला. अमरावतीच्या पर्यावरण संवर्धनात या संस्थेचा मोठा वाटा असल्याचे सांगून त्यांनी वेक्स टीम चे कौतुक केले. वेक्स ने यावर्षी २५ वर्षे पूर्ण केल्याच्या निमित्त्याने शुभेच्छा दिल्यात. वेक्स या संस्थेस २५ वर्ष पूर्ण झाले त्यानिमित्ताने रानवेध या रौप्यमहोत्सवी विशेषांकाचे विमोचन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. सोबतच डॉ. राजू कसंबे यांच्या सामान्य १०० पक्षी या पुस्तकाच्या उर्दू आवृत्तीचे प्रकाशन, प्रा आश्विन लुंगे, प्रा. गजानन वाघ व प्रतिक चौधरी यांनी तयार केलेल्या अप्पर वर्धा जलायशयाची पक्षीसूची चे प्रकाशन श्री. मनीष ढाकुलकर व श्री. किरण मोरे यांनी तयार केलेल्या मेळघाटातील सामान्य पतंग या घडीपत्रिकेचे प्रकाशन सुद्धा याप्रसंगी करण्यात आले. वर्षीचा पक्षिमित्र जीवन गौरव पुरस्कार संभाजीनगर येथील डॉ. दिलीप दिवाकर यार्दी यांना प्रदान करण्यात आला. इतर पुरस्कारांपैकी पक्षी संवर्धन व सुश्रुषा पुरस्कार अकोला येथील श्री. बाळ

उर्फ जयदीप काळने यांना तर पक्षी जनजागृती पुरस्कार वाशिम येथील श्री. मिलिंद सावदेकर यांना. पक्षी संशोधन पुरस्कार वरुड जि. अमरावती येथील श्री. प्रतिक चौधरी यांना तर यावर्षीपासून नव्याने सुरुवात झालेला पहिला नवोदित पक्षिमित्र पुरस्कार साकोली जि. भंडारा येथील विकास बावनकुळे या नवोदित पक्षिमित्रास प्रदान करण्यात आला आहे. पक्ष्यांवर सातत्याने लिखाण करणाऱ्यास दिला जाणारा पक्षी विषयक साहित्य पुरस्काराची घोषणा सुद्धा यावेळी करण्यात आली. यावर्षीचा पक्षी साहित्य पुरस्कार सांगली येथील जेष्ठ पक्षी अभ्यासक व पक्ष्यांच्या आवाजाचे तज्ञ श्री. शरद आपटे यांना तसेच भाईंदर जि. ठाणे येथील डॉ. पराग नलावडे या दोन लेखकांना देण्यात आला. नवोदित शालेय विद्यार्थ्यांस दिला जाणारा स्व. विनोद गाडगीळ नवोदित पक्षिमित्र पुरस्कार पुण्याच्या सात वर्षिय अर्पित चौधरी यांस प्रदान करण्यात आला. संपूर्ण उदघाटन कार्यक्रमाचे सूत्रसंचालन राज्यात परिचित असलेल्या सूत्रसंचालक क्षिप्रा मानकर यांनी केले. तर आभारप्रदर्शन वेक्सच्या सहसचिव प्रा. डॉ. मंजुषा वाठ यांनी केले  दोन दिवस चाललेल्या या संमेलनात विविध सत्रामध्ये एकूण २४ अभ्यासकांनी विविध विषयावर आपले सादरीकरण केले. त्यात सर्वात छोटा पक्षी निरीक्षक दहा वर्षाचा होता आणि त्याने अतिशय उत्तम असे सादरीकरण करून उपस्थितांची वाहवा मिळविली.

**दि. १ नोव्हेंबर २०२५**

**सत्र– १ ले** – पहिल्या सत्रातील विशेष सादरीकरणामध्ये बिएनएचएस चे संशोधक तथा उपसंचालक डॉ. सुजित नरवाडे यांचे गवताळ माळरानात माळढोक आणि तणमोर पक्ष्यांच्या संवर्धनाची गाथा या विषयावर तर पक्षीमित्रचे जेष्ठ सभासद तथा तणमोर पक्षी अभ्यासक यांचे तणमोर पक्षी संवर्धनासाठी राबविण्यात येणाऱ्या प्रकल्प विषयीचे सादरीकरण पार पडले. या सादरीकरणातून उपस्थितांना या दुर्मिळ व नष्ट होणाऱ्या पक्षी प्रजातींविषयी अद्यावत माहिती प्राप्त होण्यास मदत झाली. या सत्राचे अध्यक्ष म्हणून पक्षीमित्रचे जेष्ठ मार्गदर्शक डॉ. अनिल पिंपळापुरे यांनी काम पहिले.

**सत्र– २ रे – सत्राध्यक्ष– श्री. राजकमल जोब, भंडारा**

या सत्रात खालील अभ्यासकांचे सादरीकरण पार पडले

१) श्री. आनंद बोरा– नाशिकचे पक्षी वैभव

२) श्री. नितीन मराठे – जंगलातील पक्षी अभ्यास प्रकल्प

३) श्री. किरण मोरे– मेळघाटातील पक्षी आणि पतंग सहसंबंध

४)डॉ. चेतना उगले– शहरी वटवृक्ष–पक्षी वैविध्याचे आश्रयस्थान

**सत्र– ३ रे – सत्राध्यक्ष– प्रा. डॉ. सुधाकर कुऱ्हाडे, अहिल्यानगर**

या सत्रात खालील अभ्यासकांचे सादरीकरण पार पडले

१)श्री शरद आपटे– पक्षीगान : का ? केव्हा ? कोठे ?

२) श्री. शुभम गिरी–अधिवासानुसार शास्त्रीय पद्धतीने पक्षी सर्वेक्षण

३) श्री. शाहिद खान–भंडारा जिल्ह्याचे सारस क्रौंच संवर्धन मॉडेल

४) श्री. अनिल महाजन–हतनूर जलायशयावरील पक्षी जैवविविधता

५) श्री. प्रतीक चौधरी– नदी टिटवी: सद्यस्थिती, विस्तार आणि प्रजनन

६) डॉ. पराग नलावडे – किंगफिशरचे विश्व

**दि. २ नोव्हेंबर २०२५**

**सत्र– १ ले – सत्राध्यक्ष– प्रा.डॉ.रमेश चोंढेकर, छ. संभाजीनगर**

या सत्रात खालील अभ्यासकांचे सादरीकरण पार पडले

१) डॉ. राजू कसंबे– महाराष्ट्रातील दुर्मिळ पक्षी आणि त्यांच्या नोंदी

२) श्री. दर्शन दुधाने – पक्ष्यांचे प्रजनन व जीवशास्त्र

३) प्रा. डॉ. सुधाकर कुऱ्हाडे – बारडगाव : चित्रबलाकची चित्रकथा

४) डॉ. निखिल बोरोडे– सातपुड्यातील मलबार पाईड हॉर्नबिल : प्रजनन अभ्यास

**सत्र– २ रे – सत्राध्यक्ष– प्रा.डॉ. मिलिंद शिरभाते, अकोला**

या सत्रात खालील अभ्यासकांचे सादरीकरण पार पडले

१) डॉ. अनिल माळी – नाशिक जिल्ह्यातील स्थलांतरित पक्ष्यांचे थांबे व अधिवास संवर्धनाचे प्रयत्न

२) श्रीमती. दीपाली बाभुळकर– शालेय विद्यार्थ्यांमध्ये पक्षी अभ्यासाची रुजुवात

३) चि. कैवल्य बोरोडे – तिबोटी खंड्या

४) चि. अर्पित चौधरी – माझे पक्षी निरीक्षण

५) श्री. राहुल वंजारी– छोटा क्षत्रबलाक : अपघात आणि सुटका

**दुपारचे सत्र– ३ रे – सत्राध्यक्ष– प्रा.डॉ. नेहा भटकर, अमरावती**

या सत्रात खालील अभ्यासकांचे सादरीकरण पार पडले

१) प्रा. केशव प्रभाकर चौधरी– कल्याण शहरातीलन आंबिवली जैवउद्यानात आढळलेल्या रानपिंगळ्याचा अभ्यास

२) प्रा. अश्विन लुंगे– अप्पर वर्धा जलाशयावरील पक्षी वैभव व प्रजनन अभ्यास

३) डॉ. आनंद वरघट– पक्षी कीटक सहसंबंध

४) श्री. नरेंद्र गायकवाड– रामायणातील द्विजगन

संमेलनाध्यक्ष मा. प्रवीणसिंह परदेशी यांनी आपल्या भाषणात महाराष्ट्र पक्षिमित्र चळवळीचा इतिहास फार मोठा आहे असे  प्रतिपादन केले. राज्यातील पक्षी संवर्धन व जनजागृती साठी पक्षिमित्रची महत्त्वाची भूमिका बजावली आहे. भविष्यात पक्षी संवर्धन करण्यासाठी लोकसहभाग वाढविण्यासाठी महाराष्ट्र पक्षिमित्रने प्रयत्न करायला हवेत असे मत व्यक्त केले. त्यांनी पुढे त्यांच्या सादरीकरणातून भारतातील नष्ट होणाऱ्या पक्षी प्रजातींचा आढावा घेऊन यासाठी बिएनएचएस संस्थेतर्फे राबविण्यात येणाऱ्या विविध प्रकल्पांची माहिती दिली.

**ऐतिहासिक क्षण**

अमरावती येथील ३८ व्य संमेलनास राज्यभरातून उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला होता. राज्याच्या कानाकोपऱ्यातून पक्षी अभ्यासक संशोधक, वन अधिकारी आणि कर्मचारी असे सर्वच स्तरातील प्रतिनिधी या संमेलनाला उपस्थित होते. विशेष म्हणजे या पूर्वीच्या १० राज्यस्तरीय पक्षीमित्र संमेलनाचे १० माजी संमेलनाध्यक्ष यांची संमेलनातील उपस्थिती विशेष लक्षणीय होती. यामध्ये १६ व्या संमेलनाचे अध्यक्ष डॉ. दिलीप यार्दी, २४ व्या संमेलनाचे अध्यक्ष डॉ. सुधाकर कुऱ्हाडे, २७ व्या संमेलनाचे अध्यक्ष डॉ. अनिल पिंपळापुरे, २९ व्या संमेलनाचे अध्यक्ष श्री. शरद आपटे, ३१ व्या संमेलनाचे अध्यक्ष श्री. दत्ताकाका उगावकर ३२ व्या संमेलनाचे अध्यक्ष श्री. किशोर रिठे, ३३ व्या संमेलनाचे अध्यक्ष डॉ. राजू कसंबे, ३४ व्या संमेलनाचे अध्यक्ष प्रा. डॉ. निनाद शहा, ३५ व्या संमेलनाचे अध्यक्ष श्री. राजकमल जोब, ३७ व्या संमेलनाचे अध्यक्ष डॉ. अनिल माळी, यांची उपस्थिती होती. वेक्स संस्थेने या संधीचे सोने करत या सर्व उपस्थित माजी संमेलनाध्यक्ष यांना एकाचवेळी मंचावर आमंत्रित करून या सर्वांचा सत्कार घडवून आणला. ३८ व्या संमेलनाचे संमेलनाध्यक्ष तथा निवृत्त प्रशासकीय अधिकारी, मित्राया राज्य नियोजन संस्थेचे अध्यक्ष व माननीय मुख्यमंत्री यांचे आर्थिक सल्लागार मा. प्रवीणसिंह परदेशी (IAS Rtd.) यांच्या हस्ते या सर्व मान्यवरांचा शाल श्रीफळ देऊन हृद्य सत्कार करण्यात आला.

**संमेलनानिमित्त विविध स्पर्धांचे आयोजन**

संमेलनाच्या निमित्त्याने विशेष स्पर्धा घेण्यात आल्या होत्या. यामध्ये अखिल भारतीय पक्षी छायाचित्र स्पर्धा आणि शालेय विद्यार्थ्यांसाठी पक्षी चित्रकला स्पर्धांचा समावेश होता. स्पर्धांच्या विजेत्या स्पर्धकांना संमेलनाच्या उदघाटन कार्यक्रमात सन्मानचिन्ह व रोख पारितोषिके देऊन सन्मानित करण्यात आले. छायाचित्र स्पर्धा, चित्रकला स्पर्धा आणि प्रदर्शनी करीत समन्वयक म्हणून वेक्स चे सदस्य श्री. आनंद मोहोड आणि श्री. अभिजीत पाटील यांनी जबाबदारी पार पाडली. छायाचित्र स्पर्धेचे परीक्षक म्हणून श्री. मनोज बिंड व श्री. वैभव दलाल यांनी काम बघितले. ड्रॉइंग कॉम्पिटिशन करता शहरातील दहा शाळेच्या विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता. त्याकरिता कला शिक्षक जगदीश गुप्ता यांनी परीक्षक म्हणून आपली भूमिका पार पाडली.

**छायाचित्र स्पर्धेतील विजेते –**

प्रथम पारितोषिक – श्री. आशिष कुमार भट्ट, पुणे
द्वितीय पारितोषिक – श्री. नितीन जैन, पुणे
तृतीय पारितोषिक – श्री. शिवानंद हिरेमठ, सोलापूर
प्रथम उत्तेजनार्थ – श्री. सुबोध राठोड, यवतमाळ
द्वितीय उत्तेजनार्थ – श्री. गजेंद्र बावणे, अमरावती
परीक्षक पसंती – श्री. सुमित अंबुलकर, अमरावती

**चित्रकला स्पर्धेतील विजेते –**

प्रथम पारितोषिक – कु. अरण्या शर्मा
द्वितीय पारितोषिक – चि . सुकृत जामोदे
तृतीय पारितोषिक – कु. नम्रता राऊत

**महाराष्ट्र पक्षिमित्रची आमसभा – दि. १ नोव्हेंबर २०२५**

महाराष्ट्र पक्षिमित्रची आमसभा दि. १ नोव्हेंबर रोजी सायंकाळी संमेलन स्थळी पार पडली. या सभेत महाराष्ट्र पक्षीमित्रच्या आजीवन सभासदांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. यामध्ये संस्थेच्या वर्षभरातील उपक्रम, पुढील संमेलनाची जबाबदारी देणे, संमेलनातील ठराव तसेच महाराष्ट्र पक्षीमित्र संस्थेसाठी आर्थिक पाठबळ मिळविणे, संस्थेचे मुखपत्र पक्षीमित्र च्या प्रकाशनासाठी व वितरणासाठी होणाऱ्या खर्चासाठी देणगीदार शोधणे अशा विविध विषयांवर चर्चा झाली.

**संमेलनात पारित झालेले ठराव**

१) नवेगाव नागझिरा व्याघ्र प्रकल्पाला पद्मश्री मारुती चितमपल्ली यांचे नाव देण्यात यावे असा ठराव महाराष्ट्र पक्षिमित्र तर्फे डॉ. जयंत वडतकर यांनी मांडला तो महाराष्ट्र पक्षिमित्र सर्वसाधारण सभेत एकमताने मंजूर करण्यात आला.

२) दुसरा ठराव हा पक्षी अधिवासांना भटक्या कुत्र्यांपासुन धोका वाढत आहे. अशा भटक्या कुत्र्यांना आळा घालण्यासाठी संबंधित यंत्रणांनी उपाययोजना करण्यात यावी असा ठराव मंजूर करण्यात आला.

**समारोप**

संमेलनाचा समारोप कार्यक्रम दि. २ नोव्हेंबर रोजी सायंकाळी ४.३० वाजता संपन्न झाला. या कार्यक्रमासाठी हे प्रमुख अतिथी म्हणून वेक्सचे मार्गदर्शक तथा संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाचे सन्माननीय व्यवस्थापन सदस्य मा. प्रा. डॉ. प्रवीण रघुवंशी यांची उपस्थिती होती. महाराष्ट्र पक्षीमित्रचे अध्यक्ष डॉ. जयंत वडतकर आणि डॉ. राजू कसंबे यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी मंचावर वेक्सचे पदाधिकारी डॉ. गजानन वाघ, डॉ. मंजुषा वाठ, तथा कार्यकारिणी सदस्य यांची सुद्धा उपस्थिती होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी वेक्सच्या अध्यक्ष प्रा.डॉ. अंजली देशमुख होत्या. या समारोप कार्यक्रमात प्रा.डॉ. प्रवीण रघुवंशी यांनी संमेलनाच्या यशस्वी आयोजनासाठी वेक्स संस्थेचे अभिनंदन केले तसेच महाराष्ट्रात गेल्या साडेचार दशकापासून अविरतपणे कार्यरत असलेल्या पक्षीमित्र चळवळीने एक इतिहास निर्माण केल्याचे सांगितले. महाराष्ट्र पक्षीमित्रचे अध्यक्ष डॉ. जयंत वडतकर यांनी या समारोप कार्यक्रमात ३८ व्य संमेलनाच्या उत्कृष्ट आयोजनाची जबाबदारी घेऊन संमेलनाचे उत्कृष्ट आयोजन केल्याबद्दल वेक्स या आयोजक संस्थेचे अभिनंदन व आभार व्यक्त केले. तसेच संमेलनात चर्चा झालेले ठराव मान्यतेसाठी

सभागृहासमोर ठेवले. या ठरावास सर्वानुमते मान्यता घेण्यात आली. त्यानंतर पुढील वर्षीचे ३९ वे महाराष्ट्र पक्षीमित्र संमेलन आयोजनाची जबाबदारी नाशिक येथील पक्षीमित्र मंडळ नाशिक या संस्थेला देण्यात येत असल्याची घोषणा केली. या समारोपीय कार्यक्रमात वेक्सचे सदस्य श्री. किरण मोरे, श्री. सौरभ जवंजाळ, श्री. मनीष ढाकुलकर, ऍड. राजमेहेर निशाने यांचा संमेलन आयोजनासाठी केलेल्या उत्कृष्ट कार्यासाठी सन्मान करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्ष तथा वेक्सच्या अध्यक्ष प्रा.डॉ. अंजली देशमुख यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणात राज्यभरातून आलेल्या पक्षमित्रांचे आभार व्यक्त करून आपल्या उपस्थितीमुळे आम्ही हे संमेलन उत्कृष्ट रीतीने आयोजित करू शकलो असे सांगितले. तसेच आयोजन समितीचे कौतुक करून पक्षीमित्र चळवळीच्या भविष्यातील वाटचालीस शुभेच्छा दिल्यात. समारोप कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन वेक्सचे उपाध्यक्ष डॉ. श्रीकांत वऱ्हेकर यांनी केले. कार्यक्रमाचा समारोप कु रसिक जाणे हिच्या सुमधुर आवाजात गायलेल्या पसायदानाने झाला. समारोपानंतर सुमारे ६० पक्षीमित्र मेळघाट ट्रिप साठी रवाना झालेत.

**मेळघाट पक्षी निरीक्षण सहल** : संमेलनात राज्यातील कानाकोपऱ्यातून सहभागी होणाऱ्या पक्षीमित्रांना मेळघाटच्या भेटीचे आकर्षण होते. त्यामुळेच आयोजकांनी संमेलनाच्या दुसऱ्या दिवशी चे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये एकूण ५५ पक्षीमित्रांनी आपली नोंदणी केली होती. संमेलनाचा समारोप झाल्यानंतर सर्व सहभागी मेळघाटकडे रवाना झाले. या सर्व पक्षीमित्रांची निवासव्यवस्था सेमाडोह आणि कोलकाज पर्यटक संकुलात करण्यात आली होती. दुसऱ्या दिवशी सकाळी सर्वांना मेळघाटातील आकर्षण असलेला रानपिंगळा या पक्ष्याच्या अधिवासाची सफारी आयोजित करण्यात आली होती. या सहलीत मेळघाटातील गाईड श्री. भोला मावसकर, रानपिंगळा या पुस्तकाचे लेखक डॉ. जयंत वडतकर, पक्षी तज्ज्ञ डॉ. राजू कसंबे, श्री. किरण मोरे यांनी मार्गदर्शन केले. या सहलीत सर्वांना मेळघाटातील रानपिंगळा बघता आला. अनेकांनी तो पहिल्यांदाच बघितला असल्याने मेळघाटचे सहल सफल झाल्याची भावना व्यक्त केली. त्यानंतर सर्व पक्षीमित्रांनी कोलकाज येथे पक्षीनिरीक्षण करून व दुपारचे जेवण आटोपून सर्वजण अमरावतीकडे रवाना झालेत. या सहलीचे समन्वयक म्हणून श्री. अमेय ठाकरे व ऍड. राजमेहेर निशाने यांनी महत्वाची भूमिका पार पाडली. या आयोजनासाठी मेळघाट व्याघ्र प्रकल्पाचे क्षेत्रसंचालक मा. एम. आदर्श रेड्डी यांचे मोलाचे सहकार्य लाभले.

या संपूर्ण संमेलनातील सहभागीच्या नोंदणीची जबाबदारी ऍड. राजमेहेर निशाने तर मेळघाट सहलीच्या नोंदणीची जबाबदारी श्री. अमेय ठाकरे यांनी यशस्वीपणे पार पाडली. या संपूर्ण संमेलनात १४५ सहभागींची निवासव्यवस्था संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ, श्री. अंबादेवी संस्थान भक्तनिवास, व संत ज्ञानेश्वर संकुल येथे करण्यात आली होती. या निवास व्यवस्था समितीची जबाबदारी. डॉ. श्रीकांत वऱ्हेकर यांनी सांभाळली तर वाहतूक व्यवस्था श्री. सुमीत अंबुलकर यांनी सांभाळली. संमेलनातील सादरीकरणाची तांत्रिक जबाबदारी श्री. प्रतीक चौधरी यांनी समर्थपणे सांभाळली तर श्री. किरण मोरे यांनी मंचावरील समन्वयाची जबाबदारी यशस्वीपणे पार पडली. कार्यक्रमाच्या यशस्वीतेकरिता महत्त्वाची जबाबदारी ज्यांनी पार पाडली त्यात प्रा. डॉ. रमेश चोंढेकर, किरण मोरे , मनीष ढाकूलकर, सौरभ जवंजाळ, प्रतीक चौधरी, अंकुश गावंडे, डॉ. अनिरुद्ध देशमुख, आनंद मोहोड, अभिषेक पाटील, प्रशांत निकम, प्रा. सफल पाटील, सुमीत अंबुलकर सर्वेश मराठे, प्रा.डॉ. अनंत वडतकर, शशांक नगराळे यांचा समावेश होता. तसेच संस्थेशी जुळलेले स्वयंसेवक यांची मेहनत यशस्वी आयोजनात अत्यंत महत्त्वाची होती. संपूर्ण दोन दिवसातील विविध सत्रातील सूत्रसंचालनाची जबाबदारी सौ. मयुरी कथलकर, कु. रसिक जाणे, प्रा. अनंत वडतकर यांनी पार पडली सदर यशस्वी आयोजनासाठी मेळघाट व्याघ्र प्रकल्प, अमरावती वनविभाग, श्री. शिवाजी विज्ञान महाविद्यालय आणि विदर्भ ज्ञान विज्ञान महाविद्यालय येथील स्वयंसेवक तसेच सर्व प्रायोजक, सह-आयोजक, सर्व सहयोगी संस्था यांचे विशेष योगदान लाभले. वृत्तपत्र प्रतिनिधी श्री. सर्वेश मराठे, श्री. रवींद्र लाखोडे, श्री. एजाज खान, अमोल खोडे, मनीष जगताप, सलील काळे, निशिकांत राजबिंडे यांचे विशेष योगदान लाभले.



# पक्षी सप्ताहाच्या निमित्ताने दृष्टीहिनांसाठी पक्षी निरीक्षण कार्यक्रमाचे आयोजन

अमरावती येथील वन्यजीव व पर्यावरण संवर्धन संस्था (WECS) आणि महाराष्ट्र पक्षिमित्र तर्फे पक्षी सप्ताहाच्या निमित्ताने अमरावती येथील बांबू गार्डन येथे दृष्टीहिनांसाठी पक्षी निरीक्षण या अनोख्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या उपक्रमात ४५ दृष्टिहीन विद्यार्थ्यांनी पक्ष्यांचे आवाज व पिसांच्या स्पर्शाने पक्षी विश्व अनुभवले, वेक्स (WECS) व महाराष्ट्र पक्षिमित्रच्या या अनोख्या उपक्रमाचे यावर्षी सातत्याने चौथे वर्ष होते. महाराष्ट्र पक्षिमित्र संघटनेतर्फे दरवर्षी पक्षी सप्ताहात संपूर्ण राज्यात विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात येत असते. याच निमित्त्याने अमरावती मध्ये वेक्स संस्थेतर्फे विविध कार्यक्रमांचे आयोजन केले जाते. या कार्यक्रमात अनेक डोळस व्यक्ती पक्षी बघून त्याचा अभ्यास व आनंद घेत असतात, मात्र दृष्टिहीन विद्यार्थ्यांना हे पक्षी बघता येत नाहीत. त्यांनी सुद्धा ते आवाज व स्पर्शाच्या माध्यमातून अनुभवावेत व त्यांची ओळख करून घ्यावी या उद्देशाने या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येत असते.

अमरावती येथील वन्यजीव व पर्यावरण संवर्धन संस्था, महाराष्ट्र पक्षिमित्र व वनविभागाचे सहकार्याने पक्षी सप्ताहाच्या निमित्ताने दृष्टीहिन विद्यार्थ्यांसाठी पक्षी निरीक्षण: एक प्रयास या अनोख्या कार्यक्रमाचे दरवर्षी आयोजित करीत असते. या कार्यक्रमात डॉ नरेंद्र भिवापूरकर अंध विद्यालयाच्या विद्यार्थ्यांचा व शिक्षकांचा सहभाग असतो. या वर्षी या उपक्रमांत ४५ विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला होता. या कार्यक्रमाचे समन्वयक श्री. सौरभ जवंजाळ व शाळेचे मुख्याध्यापक श्री नवनाथ इंगोले यांच्या प्रयत्नातून पार पडलेल्या या कार्यक्रमात वेक्स संस्थेचे सदस्य तथा पक्षी अभ्यासक डॉ. पवन राठोड, श्री. प्रशांत निकम, अँड. राजमेहेर निशाने, अमेय ठाकरे, संकेत राजूरकर व महाराष्ट्र पक्षिमित्रचे अध्यक्ष डॉ जयंत वडतकर यांनी मार्गदर्शन केले. यावेळी वनविभागाचे विशेष सहकार्य लाभले.

कार्यक्रमाची सुरुवातीला थोर पक्षी अभ्यासक पद्मविभूषण डॉ. सालिम अली आणि पद्मश्री मारुती चितमपल्ली यांच्या आठवणींना उजाळा देऊन श्रद्धांजली वाहण्यात आली. महाराष्ट्र पक्षिमित्रचे अध्यक्ष डॉ जयंत वडतकर यांनी सर्वांचे स्वागत करून मार्गदर्शकांचा व सहभागी शिक्षकांचा परिचय करून दिला. त्यानंतर बांबू गार्डन ची माहिती व पक्ष्यांची प्राथमिक माहिती सांगून निसर्ग भ्रमणास सुरुवात करण्यात आली. निसर्ग भ्रमण दरम्यान ऐकू येणारे आवाज विद्यार्थ्यांना ऐकवून त्या पक्ष्यांची ओळख करून देण्यासाठी आकार व रंगांच्या मदतीने पक्षी समजावून सांगण्यात आले. डॉ. पवन राठोड, प्रशांत निकम व स्वप्नश्री राघोर्ते यांनी वेगवेगळ्या पक्ष्यांचे संग्रहित पिसे विद्यार्थ्यांना हाताळण्यास देऊन पक्षी कसा असतो व कसा दिसतो हे समजावून सांगण्याचा प्रयत्न केला. बांबू गार्डन मध्ये असलेल्या बांबू प्रजातींना व झाडांना स्पर्श करून, त्याच्या खोडाच्या व पानांच्या स्पर्शाच्या सहाय्याने व आकाराच्या मदतीने झाडांच्या प्रजाती विद्यार्थ्यांना समजावून सांगण्यात आल्या. शेवटी विद्यार्थ्यांनी आपले मनोगत व्यक्त करतांना पक्षी व निसर्ग अनुभवतांना त्यांना झालेला आनंद त्यांच्या बोलण्यातून दिसत होता. या कार्यक्रमासाठी उपवनसंरक्षक मा. अर्जुना के. आर. तसेच वनपरिक्षेत्र अधिकारी श्री. प्रदीप भड यांचे विशेष सहकार्य लाभले. या कार्यक्रमात मुख्याध्यापक नवनाथ इंगोले यांचेसह शाळेतील शिक्षक वृंद योगेश चौधरी, योगिता राउत, वैद्यकीय सहायक रमेश राठोड व शिक्षकेत्तर कर्मचारी यांची उपस्थिती होती.

यावेळी या उपक्रमाचे समन्वयक वेक्सचे सदस्य सौरभ जवंजाळ यांनी या उपक्रमाच्या आयोजनामागील भूमिका विशद करतांना सांगितले कि आम्ही नेहमीच पक्षी निरीक्षण करीत असतो. पक्षी निरीक्षण हा एक आनंददायी छंद आहे. पक्षी निसर्गातील सुंदर व प्रमुख असा घटक आहे. गेल्या तीन वर्षापूर्वी पक्षी सप्ताहात पक्षी निरीक्षण कार्यक्रमाचे आयोजन करीत असतांना दृष्टिहीन लोक कसे पक्षी बघत असतील? असा प्रश्न मला पडला. आणि त्यानंतर मी महाराष्ट्र पक्षिमित्रचे अध्यक्ष डॉ. जयंत वडतकर यांचेशी बोलून या कार्यक्रमाचे नियोजन केले. या कार्यक्रमाची कल्पना डॉ. नरेंद्र भिवापूरकर अंध विद्यालयातील शिक्षकांशी बोलून दाखविली. या कल्पनेस मुख्याध्यापक श्री. नवनाथ इंगोले यांनी तत्काळ प्रतिसाद दर्शविला. तेव्हापासून हा उपक्रम आम्ही दरवर्षी घेत असतो. या कार्यक्रमातून आम्हाला विशेष आनंद होतो.

# गुलाबी तीरचिमणी अर्थात रोझी पिपिट ची अमरावतीमधील दुर्मिळ नोंद

महाराष्ट्रात अगदीच मोजक्या नोंदी असलेला रोझी पिपिट हा पक्षी अमरावतीच्या जलाशयावर यावर्षी नोव्हेंबर महिन्यात पाहण्यात आला. अमरावतीला या पक्ष्याची पहिली नोंद २०२० मध्ये झाली होती मात्र त्याचे छायाचित्र सुस्पष्ट नसल्याने त्यावेळी सुमारे वर्षभरानंतर याची नोंद ई-बर्ड या संकेत स्थळावर अभिमन्यू आराध्य आणि मनोज बिंड या पक्षिनिरीक्षकांनी केली होती. यावेळी मात्र त्याचे दुसऱ्यांदा आगमन झाले. **प्रशांत निकम पाटील आणि मनोज बिंड** यांना यावेळी त्याचे चांगले छायाचित्र काढण्यात यश आले आहे. उपलब्ध माहितीनुसार महाराष्ट्रात हा उल्लेखनीय पक्षी भिगवण आणि नांदूर मध्यमेश्वर यानंतर केवळ अमरावतीमध्येच नोंदवल्या गेलेला आहे.

भारताच्या काश्मीर, लडाख सोबतच नेपाळ आणि चीन मध्ये विण घालणारा हा पक्षी हिवाळ्यात थंडीचा कडाका वाढला की खाली उत्तर भारतातील मैदाने आणि मध्यभारतात उतरतो. इथे त्याला तुलनेने मुबलक खाद्य मिळते. उन्हाळ्यातील विण काळात याच्या छातीवर आणि पंखांवर फिकट गुलाबी रंगाची छटा येते, त्यावरून त्याचे नाव पडले आहे. हिवाळ्यात मात्र हा काहीसा करडा किंवा हिरवट करडा दिसतो. डोक्याच्या वरच्या आणि मागील बाजूने काळसर रेषा, थेट मानेपर्यंत पोहोचणारी मोठी पांढरी सलग भुवई, छातीपासून पोटापर्यंत पोहोचणाऱ्या ठळक रेषा ह्या याच्या महत्वाच्या ओळखीच्या खुणा आहेत. जमिनीवर चालतांना हे पक्षी सतत खाली वर हलवत असतात.

साधारणपणे बरेच पिपिट पक्षी कोरड्या आणि मोकळ्या माळरानाचा अधिवास म्हणून स्वीकार करतात. पण रोझी पिपिटला चिखलातील लहान कीटक, अळ्या आणि ओलसर गवताच्या बिया असे खाद्य मुबलक उपलब्ध असणारा जलाशय किंवा पाणथळीच्या बाजूने ओलावा किंवा पाणी असणारा अधिवास आवडतो. अँथस रोजिटस असे शास्त्रीय नाव असलेला हा पक्षी उंचीवरून आणि लांबवर स्थलांतर करणाऱ्या पक्ष्यांच्या श्रेणीत गणला जातो.




****

## वन्यजीव छायाचित्रणात भारताचा झेंडा जागतिक स्तरावर फडकला ! बैजू पाटील ठरले जगातील 'नंबर १' छायाचित्रकार!

प्रसिद्ध वन्यजीव छायाचित्रकार बैजू पाटील यांनी 'रिफोकस अवॉर्ड्स २०२५' (Refocus -wards 2025) मध्ये जागतिक स्तरावर प्रथम क्रमांक पटकावून सुवर्णपदक जिंकले आहे. १०९ देशांतील स्पर्धकांना मागे टाकून हा मान मिळवणारे ते पहिलेच भारतीय ठरले आहेत.

ऐतिहासिक क्षण : भरतपूर पक्षी अभयारण्यात त्यांनी टिपलेले एक छायाचित्र या पुरस्कारासाठी निवडले गेले. यामध्ये एक 'स्नेक बर्ड' (सर्पपक्षी) मासा पकडून पाण्यातून बाहेर येत आहे, तर दुसरीकडे एक 'ग्रे हेरॉन' (राखाडी बगळा) त्या शिकारीवर टपून बसला आहे. निसर्गातील हा थरार त्यांनी अतिशय अचूकपणे कॅमेऱ्यात कैद केला आहे.





****

**महाराष्ट्र पक्षिमित्रचे आजीवन सभासद**
**श्री मिलींद सावदेकर** यांना मिळालेल्या पुरस्काराची रक्कम त्यांनी महाराष्ट्र पक्षिमित्रला अंकनिधी २५००/- रूपये दिले त्याबद्दल महाराष्ट्र पक्षिमित्रतर्फे मन:पूर्वक धन्यवाद् !

**महाराष्ट्र पक्षिमित्रचे आजीवन सभासद**
**श्री रविंद्र वामनाचार्य** यांनी महाराष्ट्र पक्षिमित्रला अंकनिधी १०००/- रूपये दिले त्याबद्दल महाराष्ट्र पक्षिमित्रतर्फे मन:पूर्वक धन्यवाद् !

## ‘अरे खोप्यामधी खोपा, सुगरणीचा चांगला, देखा पिलासाठी तिनं, खोपा झाडाले टांगला!’

लहान असतांना बहिणाबाईंची ही सुप्रसिद्ध कविता ऐकून होते. त्यामुळेही कदाचित, सुगरणीच्या खोप्याचे मला खास आकर्षण असेल. अमरावतीमध्ये मी, ‘गिरमकर लेआउट’मध्ये रहायची. तिथल्या, ‘विक्रांत लॉन’मध्ये सुगरण पक्ष्यांची मोठी कॉलनीच होती. घराला अगदी लागुनच ही जागा. त्यामुळे, सुगरणीच्या नरांची घरटे बांधण्याची लगबग, त्यांच्या मादीची घरटेनिवड; आणि मग अंडी, पिल्ले आणि त्यांचे संगोपन या क्रिया तासनतास मी बघत असायची, आणि कॅमेरामध्ये कैद करायची. रोज सकाळी सुगरणीच्या किलबिलाटाने जाग यायची. माझ्या वाईल्ड लाईफ फोटोग्राफीची सुरुवात किंवा सराव, सुगरणीच्या घरट्यापासूनच झाली, असे म्हटले तरी वावगे ठरू नये. सुगरणीच्या खोप्यात त्यांची अंडी खाण्यासाठी साप टपूनच असतो, असे ऐकले होते. मुख्यत: धामण ही सर्प-प्रजाती सुगरणीच्या घरट्याचा शत्रू म्हणूनच ओळखली जाते. जंगलात अथवा बाहेर फिरतांना कधीही सुगरणीचा खोपा दिसला की, सापाचा विषय डोक्यात यायचाच! आणि दरवर्षी पूर्ण रविवार मी सुगरणीमागच्या भटकंतीत घालवायचे.

पुढे, सुगरणीच्या प्रत्येक सूक्ष्म हालचालींचे फोटो मिळाले. त्यावर एक शोध प्रबंध लिहिता येईल, एवढे डॉक्युमेंटेशन तयार झाले - मी त्यावर पीएचडी केली नाही तो भाग वेगळा! पण, माझे मन आसुसले होते ते साप आणि सुगरण कधी आमने-सामने येतात हे बघण्यासाठी! हा विचार अर्थातच असुरी आनंदाचा होता. त्यापायी छत्रीतलाव, भानखेडा रोड, बोर धरण, असे अमरावतीच्या आजूबाजूचे परिसर मी पालथे घातले. यात पाच-सहा वर्षे गेली. मनाची निराशा झाली. पण म्हणतात ना, ‘काखेत कळसा अन गावाला वळसा,’ मी कल्पिलेले दृश्य घरामागच्या लॉनशेजारी असलेल्या विद्यापीठ परिसरातच बघायला मिळाले. तो दिवस होता, ऑगस्ट २०२३चा रविवार! खूप झाली फोटोग्राफी आता निरीक्षण करुया, असे ठरवून, मी कॅमेरा बॅगमध्ये ठेऊन तशीच बसली होती. अचानक सुगरणीचा किलबिलाट तीव्र झाला. तो त्यांचा आवाज नेहमीसारखा नव्हता. तेवढ्यात वरून खाली धपकन पडल्यासारखे, काही झाले. पाहिले तर, ती जवळपास आठ-फुटी धामण होती. सळसळत ती पुन्हा झाडावर चढती झाली. इथे मला काय करू नि काय नको, असे झाले होते. ओव्हर एक्साइटमेंटमध्ये धडपडतच कॅमेरा बॅगमधून काढला. नेमके दृश्य टिपण्यासाठी पटकन जागा शोधली. धामण पुन्हा घरट्याकडे पोहोचेपर्यंत आपला कॅमेरा आयलेव्हल शॉटसाठी तयार असावा, ही त्यामागे इच्छा - पुन्हा तोच असुरी आनंद! धामण आता बाभळीच्या काटेरी लोंबत्या फांदीवर असलेल्या खोप्यापर्यंत अलगदपणे पोहोचली होती. सगळ्या सुगरणी तिला चिवचिवाट करून चोचीने हुसकावून लावत होत्या. मी कॅमेरा मॅन्युअल मोडमध्ये नेला. शटरस्पीड २००० अन आयएसओ १०००पर्यंत नेऊन पटापट फोटो घेणे चालू केले. त्या भल्या मोठ्या धामणीचा तो एवढासा सुगरण पक्षी जीव तोडून प्रतिकार करीत होता. घरट्यातील पिले व अंडी वाचवण्यासाठी त्यांची चाललेली धडपड पाहून मन सुन्न झाले. बराच वेळ कॅमेरा क्लिक न करता हाती तसाच होता. वाटलं जाऊन त्यांची मदत करावी. पण, हे निसर्गचक्र आहे आणि त्यात आपण ढवळाढवळ करायची नाही, हे देखील जाणून होते. शेवटी सुगरण आणि धामण दोघेही आपापल्या आस्तित्वासाठीच लढत होते. त्यांच्या लढतीचे जे फोटो मिळाले, त्याने माझी पर्यावरणाप्रती असणारी समज आणखी समुद्ध केली, हे खरे! तो क्षण मी कधीही विसरू शकणार नाही. दोन दिवसांनी पुन्हा तिथे जाऊन बघितले तेव्हा सुगरणीची संपूर्ण कॉलनी शांत होती. प्रत्येक घरट्याला एकेक छिद्र पडले होते. सुगरणीचा घरट्यात मागमूसही नव्हता.

**मिनाक्षी राजपुत**
वन्यजीव छायाचित्रकार,
अमरावती



## ५ वे उत्तर महाराष्ट्र पक्षिमित्र संमेलन

चातक निसर्ग संवर्धन संस्था आयोजित पाचवे उत्तर महाराष्ट्र पक्षी मित्र संमेलन यशस्वी संपन्न चातक निसर्ग संवर्धन संस्थेच्या वतीने पाल, यावल अभयारण्य येथे आयोजित करण्यात आलेले पाचवे उत्तर महाराष्ट्र पक्षी मित्र संमेलन नुकतेच अत्यंत उत्साहात व यशस्वीरीत्या पार पडले. या दोन दिवसीय संमेलनात १५० पेक्षा अधिक पक्षी मित्र व निसर्गप्रेमींनी सक्रिय सहभाग नोंदवला. चंद्रपूरपासून सोलापूर, मुंबईपासून नागपूरपर्यंत संपूर्ण महाराष्ट्रातून पक्षीप्रेमी या संमेलनासाठी उपस्थित होते. यासोबतच स्थानिक निसर्गप्रेमी नागरिकांचीही मोठ्या प्रमाणावर उपस्थिती लाभली. विद्यार्थ्यांमध्ये वैज्ञानिक दृष्टिकोन व निसर्ग संवर्धनाची जाणीव निर्माण व्हावी या उद्देशाने पोस्टर प्रेझेंटेशन स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते.

पक्षीप्रेमींसाठी विशेष आकर्षण ठरलेली बर्ड्स कॉल क्विझ स्पर्धा उत्स्फूर्त प्रतिसादासह पार पडली. संमेलनासाठी राज्यभरातून आलेल्या निसर्गप्रेमींना स्थानिक संस्कृतीची ओळख व्हावी, या उद्देशाने आदिवासी नृत्याचे सादरीकरण आयोजित करण्यात आले होते.

सातपुड्यातील निरभ्र आकाशाचा लाभ घेत खगोलप्रेमींसाठी अवकाश निरीक्षण सत्राचे आयोजन करण्यात आले. दुसऱ्या दिवशी पहाटे सातपुडा जंगल सफारीचे आयोजन करून सहभागी पक्षीप्रेमींना विविध पक्षी व वन्यप्राण्यांचे प्रत्यक्ष दर्शन घडविण्यात आले.

**उद्घाटन व मान्यवरांची उपस्थिती** : दिनांक २७ डिसेंबर, शनिवार रोजी सकाळी १०.३० वाजता संमेलनाचे उद्घाटन पार पडले. उद्घाटन हेमंत शेवाळे, संचालक, दादासाहेब चौधरी वन प्रशिक्षण संस्था, पाल यांच्या हस्ते करण्यात आले.उद्घाटनप्रसंगी संमेलन अध्यक्ष डॉ. विनोद भागवत, माजी संमेलन अध्यक्ष अनिल महाजन, श्री अभय उजागरे, श्री अनिल माळी, श्री सुधाकर कुऱ्हाडे, श्री निनाद शहा, तसेच श्रीमती शितल नागराळे, वनक्षेत्रपाल, पाल आदी मान्यवर उपस्थित होते.


संमेलनाचे प्रास्ताविक चातक निसर्ग संवर्धन संस्थेचे अध्यक्ष व माजी संमेलन अध्यक्ष अनिल महाजन यांनी केले. दोन दिवसीय संमेलनादरम्यान विविध पक्षी मित्र व पक्षी अभ्यासकांची पॉवर पॉइंट सादरीकरणे घेण्यात आली.

**समारोप**ः समारोपीय कार्यक्रम श्रीमान एम. झेड. सरवर, मुख्य महाप्रबंधक, आयुध निर्माणी वरणगाव तसेच भुसावळ रेल्वे विभाग चे डी.आर.एम. श्री पुनीत अग्रवाल यांच्या उपस्थितीत पार पडला.

हे संमेलन पक्षी व निसर्ग संवर्धनाच्या दृष्टीने अत्यंत प्रेरणादायी ठरले असून, उत्तर महाराष्ट्रातील पक्षी अभ्यासक व निसर्गप्रेमींना एकत्र आणणारे एक महत्त्वपूर्ण व्यासपीठ म्हणून त्याची ओळख अधिक दृढ झाल्याची भावना सहभागींच्या प्रतिक्रियांतून व्यक्त झाली.

## टपाल तिकिटांच्या दुनियेत

### काळया मानेचा करकोचा
### Blacked Necked Stork



**रवींद्र वामनाचार्य**
जेष्ठ पक्षी अभ्यासक, नाशिक
E-mail ID : r_wamanacharya@yahoo.co.in

भारतात सहा प्रकारचे करकोचे आढळुन येतात, त्यापैकी काळया मानेचा करकोचा हा एक उंच, लांब मानेचा आकर्षक पाणथळ पक्षी आहे. हा पक्षी आग्नेय आशिया, ऑस्ट्रेलिया आणि भारतीय उपखंडात आढळतो. भारतात तो राजस्थान, भरतपुर, दिल्ली जवळ आणि महाराष्ट्रातही दिसतो. त्याच्या डोक्यावर, मानेवर आणि पाठीवर चमकदार काळया रंगाच्या पंखाचा समावेश असतो, तर त्याचे पोट आणि पंखाचे काही भाग पांढरे असतात. त्याची चोच काळ्या रंगाची व थोडी वक्रअसते. पाय लांब व लाल रंगाचे अगतात. प्रौढ पक्ष्याचे डोके मान आणि शेपटी चमकदार निळसर काळ्या रंगाची असते. त्याची पाठ, पोट चमकदार पांढरे असतात. नर व मादी सारखेच दिसतात फक्त मादीच्या डोळ्याभोवती पिवळया रंगाची कडा असते.

हे पक्षी नद्या, तलाव, दलदलीचा प्रदेश, भात खाचरे आणि इतर पाणथळ जागांजवळ रहातात. येथे तो मासे, बेडूक आणि सरपटणारे प्राणी या सारख्या विविध प्राण्यांची शिकार करतो. त्याच्या संरक्षणासाठी पाणथळ प्रदेशांचे संरक्षण व संवर्धन महत्वाचे आहे.

आंतरराष्ट्रीय निसर्ग संवर्धन संघटनेने (IUCN) या प्रजातीला धोक्याच्या जवळ (Near threatned) म्हणून वर्गीकृत केले आहे.

अशा या सुंदर पक्ष्यावर श्रीलंकेच्या टपाल विभागातर्फे दोन तिकीटे प्रकाशित केली आहेत. त्याचप्रमाणे ऑस्ट्रेलिया या देशाने सुद्धा आकर्षक टपाल तिकीट काढले आहे.








३८ वे महाराष्ट्र पक्षिमित्र संमेलनाचे समारोपीय कार्यक्रमात
मारूती चिंमिपल्ली व डॉ. सालिम अली यांना आदरांजली



३८ व्या महाराष्ट्र पक्षिमित्र संमेलनाचे अध्यक्ष मा. प्रविणसिंह परदेशी
यांचा सत्कार करतांना प्रा. डॉ. प्रविण रघुवंशी



३८ वे महाराष्ट्र पक्षिमित्र संमेलनादरम्यान पार पडलेल्या
आमसभेत उपस्थित महाराष्ट्र पक्षिमित्रचे पदाधिकारी



३८ व्या महाराष्ट्र पक्षिमित्र संमेलनात मान्यवरांच्या हस्ते
विविध पुरस्कारांचे वितरण करण्यात आले



पाल येथील ५ व्या उत्तर महाराष्ट्र पक्षिमित्र संमेलनाच्या
उद्घाटनप्रसंगी मान्यवर



कोहापूर येथील जिल्हास्तरीय संवाद सभेमध्ये उपस्थित अध्यक्ष डॉ. जयंत वडतकर,
श्री. रविंद्र आष्टेकर, प्रा. अनिल मगर,श्री. अनंत पाटील व म.प.चे सभासद





अमरावती येथील वेक्स आणि महाराष्ट्र पक्षिमित्र तर्फे पक्षी सप्ताहाच्या निमित्तानेबांबू गार्डन येथे दृष्टीहिनांसाठी पक्षी निरीक्षण  या अनोख्या कार्यक्रमाचे आयोजन
दृष्टिहीन विद्यार्थ्यांनी पक्ष्यांचे आवाज व पिसांच्या स्पर्शाने अनुभवले पक्षी विश्व



धामण आता बाभळीच्या काटेरी लोंबत्या फांदीवर असलेल्या खोप्यापर्यंत अलगदपणे पोहोचली होती. सगळ्या सुगरणी तिला चिवचिवाट करून चोचीने हुसकावून लावत होत्या. मी कॅमेरा मॅन्युअल मोडमध्ये नेला. शटरस्पीड २००० अन आयएसओ १०००पर्यंत नेऊन पटापट फोटो घेणे चालू केले. त्या भल्या मोठ्या धामणीचा तो एवढासा सुगरण पक्षी जीव तोडून प्रतिकार करीत होता. घरट्यातील पिले व अंडी वाचवण्यासाठी त्यांची चाललेली धडपड पाहून मन सुन्न झाले. पण त्यांच्या लढतीचे जे फोटो त्याने माझी पर्यावरणाप्रती असणारी समज आणखी समृद्ध केली, हे खरे!



**मिनाक्षी राजपुत**
वन्यजीव छायाचित्रकार,
अमरावती

Book Post

प्रति,

प्रेषक :
**महाराष्ट्र पक्षिमित्र**
६३, अरण्यार्पण, समता कॉलनी
कठोरा रोड,अमरावती
४४४ ६०४

*E-mail : pakshimitra@gmail.com*
*website : www.pakshimitra.org*
*Mob.+91 7030101981*

**पक्षिमित्र**
संपादक : किरण मोरे
मूल्य ₹ ५/-
मासिकात व्यक्त केलेल्या विचारांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.
अक्षरजुळणी : ज्ञानपथ प्रकाशन
मुद्रक : ज्ञानपथ प्रकाशन